

# आपला भारत १०
# सीमान्त राज्ये


राजा मंगळवेढेकर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रभारत
सं. क्र. ५०९

REFBK-0021741








## मराठी ग्रंथ सग्रहालय, ठाणे.

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल


14 AUG 1977

10 DEC 1978

8 SEP 1984

22 SEP 1987



वि क्र ५८१

२१०८९
०१८५
३१८१८८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५८१ सू प्रा
२१५८९

# आपला - भारत १९

## भिन्नतेत या अभिन्न

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ भारती
लक्ष हस्त, लक्ष पाद, हृदय एक भारती।
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरिहि एक संस्कृती ॥ १ ॥
भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती।
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥ २ ॥
भिन्न भवन, भिन्न हवन, भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न तरी, एक गगन-माती।
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर झंकृती
कमलपुष्प हासते पाकळ्यांतुनी किती ॥ ३ ॥

राजा मंगळवेढेकर

# सीमान्त राज्ये

राजा
मंगळवेढेकर

REFBK-0021741

नितीन प्रकाशन
पुणे

अनुक्रम :


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नागाची नागभूमी | . १ | | नृत्यभूमी मणिपूर | . | १७ |
| सीमान्त राज्य त्रिपुरा | .. ३९ | | मेघमंडित मेघालय | ... | ४७ |
| उद्यानभूमी सिक्कीम | . ५९ | | लोकसाहित्य | ... | ६७ |



प्रकाशक
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ
पुणे - ३०

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट १९७६



© राजा मंगळवेढेकर



किंमत
पाच रुपये

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०

# नागांची नागभूमी

भारताच्या नैऋत्य दिशेला आसाम आणि ब्रह्मदेश यांच्या कुशीत ' नागभूमी ' वसलेली आहे. ' नागालँड ' या नावाने ती प्रसिद्ध आहे.

नाग म्हटल्याबरोबर आपल्याला सर्पराजाची आठवण होते. पण त्या नागाचा या नागाशी काहीही संबंध नाही. नाग हे इकडील जमातीचे एक नाव आहे.

नागाना नाग का म्हटले जाते याविषयी पंडितांची काही मते आहेत. काहींना वाटते की, हा प्रदेश डोंगराळ आहे, पहाडी आहे, तेव्हा या प्रदेशात, म्हणजे ' नग ' भागात राहाणारे ते ' नगलोक '. नग म्हणजे पर्वत या पर्वत-पुत्रांनाच पुढे नाग-लोक म्हणून ओळखू लागले. या नागलोकाची वस्ती जिथे ती स्वाभाविकपणेच ' नागभूमी ' म्हणून प्रसिद्ध पावली.

काही पंडितांना वाटते, ' नोक ' या शब्दावरून ' नाग ' हा शब्द आला असावा. तिकडील लोकाच्या भाषेत ' नोक ' असा शब्द आहे. त्याचा अर्थ ' लोक ' असा होतो. या ' नोक'चे पुढे ' नोग ' हे रूप झाले आणि ' नोग'चेच पुढे ' नागा ' हे रूप बनले असावे !

' नगवासी ' ते ' नाग ' अशी संज्ञा सपाट–मैदानी भागातल्या लोकानी दिली असण्याचीही शक्यता आहे.

नागभूमीच्या पूर्वेला ब्रह्मदेश, पश्चिमेला आणि उत्तरेला आसाम राज्य तर दक्षिणेला मणिपूर याचा शेजार जिमलेला आहे. ही भूमी नगमंडित असून प्राचीन काळापासूनच नागा लोक या पहाडी भागात वास्तव्य करून आहेत. सारा प्रदेशच दुर्गम, डोंगराळ असल्यामुळे बाहेरच्या जगाचा वारा कित्येक वर्षे या लोकांना लागलाच नाही. त्यामुळे नवे विचार, नव्या सुधारणा याचीही त्यांना तशी फारशी ओळखदेख परवापर्यंत नव्हती. आपल्याच पहाडी पर्यात ते जगत होते. कोणे एके काळी तर या लोकांत भयकर प्रथा होती. माणसाची मुंडकी तोडून

आपले प्रभुत्व ते सिद्ध करत असत. रानटी अवस्थेतच हा समाज वावरत होता. नव शिक्षण, सुधारणा इत्यादींचा वाराही त्याना लागलेला नव्हता. शतकानुशतके डोंगर-कपारीत हे लोक जन्मले आणि वाढले. तेच, तेवढेच त्याचे सीमित विश्व होते. परंतु ब्रिटिश राजवटीच्या कालावधीत ख्रिस्ती मिशनरी धर्म-प्रसाराच्या हेतूने अन्य मागासलेल्या भागाप्रमाणेच याही प्रदेशात शिरले आणि धर्मप्रचारा बरोबरच काही सुधारणाही त्याच्या संपर्काने घडू लागल्या. कोहिमासारख्या शहरात तर अन्य राज्यातल्या शहराप्रमाणेच सर्व तऱ्हेची झकपक दिसते. अद्ययावत वेषभूषा केलेले व सफाइदार इंग्रजी भाषा बोलणारे अनेक स्त्री-पुरुष आढळतात. नागाच्या मागासलेपणाचा मागमूसही शहरी जीवनात आढळत नाही.

शेती हाच या प्रदेशातील लोकाचा मुख्य व्यवसाय आहे. डोंगराळ प्रदेशा-मुळे शेती ' शिडीनुमा ' म्हणजे शिडीसारखी टप्प्याटप्प्याची असते. काही ठिकाणी ' झूम ' पद्धतीची, म्हणजे फिरती-शेती करण्याची प्रथा आहे; म्हणजे या वर्षी ज्या जमिनीत पीक घेतले जाईल त्या जमिनीत पुढल्या वर्षी पेरणी करीत नाहीत. जंगल तोडून नवीन जमीन पेरणीसाठी तयार करतात.

भात हे नागाचे मुख्य अन्न आहे. भाताबरोबरच शेतीत मका, कापूस, ऊस, बटाटे व भाजीपाला पिकवतात.

शिकार हा नागाचा जवळ जवळ दुसरा व्यवसायच आहे. मिथुन म्हणजे रानरेडा, बकरी, डुक्कर, कोंबडी याच्या मासाबरोबरच काही जमातीमध्ये इतरही पशू-पक्ष्याचे मास आहारात असते.

नागाची गावे पर्वत माथ्यावर वसलेली असतात. गावाच्या सभोवार दगडी भिंतीचे किंवा बांबूंचे कुंपण घातलेले असते. नागाची घरेदेखील बांबूंची आणि उंच जागी, मचाणावर बांधलेली असतात. घराच्या प्रवेशद्वारावर माणसाच्या कवटीचा सांगाडा आणि शिंगे बसवलेली असतात. घराण्यातल्या पराक्रमी पुरुषाने गाजवलेल्या शौर्याचे ते प्रतीक असते.

नागा नागामध्येही विविध नावाच्या सतरा-आठरा जमाती आहेत. त्यात सेमा, आवो, अंगामी, लोथा, चाकेसाग, कोनयाक्स, संगटाम्स या प्रमुख आहेत. कुकी, झेलियाग, रेंग्या, थिमाचिंगद, फोन इत्यादी आणखी लहान लहान जमाती आहेत. या सर्व जमाती व अन्य मिळून नागभूमीची लोकसंख्या ५,१५,५६१ आहे.

खिस्ती धर्मप्रचारामुळे या प्रदेशात सध्या बहुसंख्य लोक खिश्चन धर्माचे आहेत. त्यांची संख्या १,९५,५८८ आहे. त्या खालोखाल हिंदू ३४,६७७, मुस्लीम ८९१, जैन २६३, शीख २५५ बौद्ध ४२ आणि अन्य १,३७,४४४ आहेत.


अंगामी नागा

नागभूमीत शिक्षणाचा प्रसार खिश्चन धर्मप्रसारकांनीच केला. सध्या तेथील साक्षरतेचे प्रमाण २७.३३ टक्के आहे.

या प्रदेशात एक लाखावर लोकवस्ती असलेली शहरे फक्त तीनच आहेत. त्यापैकी कोहिमा हे नागभूमीच्या राजधानीचेच शहर असून त्याची लोकवस्ती १,७४,९१० आहे, तर अन्य दोन शहरे म्हणजे मोकोकचुंग व ट्युएन्संग ही जिल्ह्याचीच ठिकाणे आहेत. या प्रदेशात वरील तीनच जिल्हे आहेत. मोकोकचुंग शहराची लोकसंख्या १,६८,६७१ आहे, तर ट्युएन्संग शहराची १,७१;९८० आहे. वीस ते चाळीस हजार वस्तीचे एकच शहर आहे, तर दहाचे वीस हजार वस्तीची दोन शहरे आहेत. त्याशिवाय बाकीची ८१४ लहान लहान वस्तीची खेडी आहेत.

नागभूमीचे एकूण क्षेत्रफळ १६,५२७ किलोमीटर आहे.

बहुतेक सर्व प्रदेश डोंगराळ व घनदाट झाडींने व्यापलेला आहे. या प्रदेशातील काही पर्वताची शिखरे सहा ते दहा हजार फूट उंचीची आहेत. वर्षाला सरासरी १०० इंच पाऊस येथे पडतो.

१ डिसेंबर १९६३ रोजी 'नागभूमी'–नागालँड–या नव्या राज्याची स्थापना झाली. भारतामधील या सोळाव्या राज्यनिर्मितीने नागा लोकांची स्वतंत्र

राज्याची मागणी भारताचे त्यावेळचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यानी पूर्ण केली.

**साक्षी इतिहास**

नागाच्या प्राचीन इतिहासाचे एल्विन नामक संशोधकाने संशोधन करून त्याचा तेराव्या शतकापासूनचा इतिहास सुसंबद्ध रीतीने दिला आहे. तत्पूर्वीचा विस्कळीत व अनिश्चित स्वरूपात आहे.

तसा नागा लोकाना अति प्राचीन इतिहास आहे. आर्य हिंदुस्थानात येण्यापूर्वी अनार्य येथे वसती करून होतेच. या भागातील तत्कालीन रहिवाश्याना 'किरात' असे म्हणत. किरात लोक अन्य अनार्यांपेक्षा भिन्न आहेत. ते दिसायला सोनेरी वर्णाचे व देखणे आहेत. हे आदिवासी गिरिजन; पण इतर भिल्ल, निषाद, साबर इत्यादी आदिवासी जमातीतले लोक कृष्णवर्णीय आहेत.

किराताचा उल्लेख प्राचीन संस्कृत ग्रंथातून आढळतो. अर्जुनाच्या भेटीसाठी शंकरपार्वती जेव्हा गेले तेव्हा त्यानी किरात वेष धारण केलेला होता, असे महाभारतातच म्हटलेले आहे. यावरून त्यांचे प्राचीनपण व सौंदर्यही लक्षात येते. नागा लोक स्वतःला 'दिम्सा' असे म्हणवून घेतात. या मागेही एक आख्यायिका आहे ती अशी :

एकदा भीम या प्रदेशात आला असता हिडिम्बा नावाच्या राजकुमारीशी त्याची गाठ पडली. दोघांचे प्रेम जुळले आणि त्याचे लग्नही झाले. पुढे त्याना घटोत्कच नावाचा मुलगाही झाला, ही कथा प्रसिद्धच आहे. हिडिम्बा या नावाचाच अपभ्रंश दिम्सा असा कालांतराने झाला. आज या प्रदेशात दिम्सापूर नामक जे शहर आहे त्याचे प्राचीन नाव हिडिम्बापूर असेच होते.

या भूमीत राहाणाऱ्या नाग लोकाचा इतिहास १३ व्या शतकापासून उपलब्ध आहे. १३ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रह्मदेशातील 'शान' जमातीचा प्रमुख सुखपा याने पत्कोई पर्वत व चिदविन नदी ओलांडून नागभूमीवर आक्रमण केले आणि नाग लोकाना जिंकले. कालांतराने आसाम प्रदेशातील अहोम राजानी शान राजवटीपासून त्यांना जिंकून घेतले. अशा प्रकारे ब्रह्मदेश आणि आसाम याच्या गुलामगिरीत बराच काळ नागलोकाना जगावे लागले. १५३० साली नागानी अहोम सैनिकाचा पराभव करून त्याच्या काही तोफा काबीज केल्या. तेव्हापासून १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत अहोम आणि नाग याच्यात सतत शत्रुत्व नांदत

होते. नागानी अहोम राजवटीविरुद्ध अधून मधून बंडे केली होती. नागालोक हे युद्धकलेत अत्यंत निष्णात आहेत. ते आसामी राजाना सार्वभौम मानीत. पण त्यांना कर वगैरे देत नसत. मध्यंतरीच्या काळात हिंदुस्थानात मोगलाची सत्ता नादली, परंतु नागभूमीवर तिचा अंमल स्थापन झाला नव्हता. १८ व्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश व ब्रह्मी लोक याच्या कटकटी सुरू झाल्या; त्याचे परिणाम नागाना



गावाचा दरवाजा

भोगावे लागले. १८२४ मध्ये आसामवर ब्रिटिशाची सत्ता स्थापन झाल्यावर नागभूमीवरही इंग्रजी राजवट सुरू झाली. १८७८ मध्ये ब्रिटिश सत्तेचे मुख्य केंद्र येथे स्थापण्यात आले १८८१ मध्ये नागा हिल्स हा एक जिल्हा बनविण्यात आला आणि मोकोकचुंग येथेही एक सत्तेचे केंद्र स्थापण्यात आहे. ब्रिटिशाच्या या प्रशासन

व्यवस्थेमुळे नागभूमीतील अशांतता व बंडखोरी काबूत आली. बहुतेक नाग जमातींनी नवीन राजवटीचे स्वागत केले. नागलोक शेती आणि उद्योगधंदे करू लागले. त्याच काळात अनेक ख्रिस्ती मिशनरी तेथे गेले व त्यांनी ख्रिश्चन धर्माचा प्रसार सुरू केला. धर्मप्रसाराबरोबरच त्यानी नागाच्या जीवनात सुधारणाही घडवून आणल्या. १९०२ पर्यंत नागभूमीतील पूर्वेकडचा तु-एन-साग हा भाग एका वटहुकमान्वये ब्रिटिश जनरलच्या अधिकारात आणला गेला. १९१३ साली वाकचँग येथे एक ठाणे स्थापण्यात आले. एवढे झाले तरी ब्रिटिशाचा या भूमीवर प्रत्यक्ष असा राज्यकारभार कधीच चालला नाही. कधी काळी फारच कटकटी झाल्या तर सैन्य पाठवून तात्पुरता बंदोबस्त करायचा एवढेच त्यांचे धोरण असे. त्यामुळे या भागावर ब्रिटिशाची सत्ता नाममात्रच राहिली.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस जपानी सैन्य कोहिमापर्यंत पोहोचले आणि नागा हिल्स व तु-एन-साग या भागातही ते पसरले. पण नागांनी त्याना थारा दिला नाही. जपानी सैनिकानी नागांचा खूप छळ केला. त्याची खेडी जाळली, आणि अनेकाना ठारही मारले. परंतु नाग ब्रिटिशाशी एकनिष्ठ राहिले. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानतर भारत सरकारने या सर्व भूमीवर आपले शासन सुरु केले, आणि त्या भागातील सर्व आदिवासींच्या विकासाचीही व्यवस्था केली. रस्ते बाधले, शाळा उघडल्या, दवाखाने काढले, शेतीची सुधारणाही केली. या उपक्रमामुळे सर्वसाधारण नाग जमातींना समाधान वाटले. पण त्याच्यातील काही महत्त्वाकांक्षी कुटिर प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांनी मात्र नाग लोकाना भारताच्या सार्वभौम सत्तेविरुद्ध बंडाचे निशाण उभारण्यास चिथावणी दिली. त्यामुळे नागभूमीत भारत विरोधी चळवळ सुरू झाली. नव्या राज्यघटनेत नागभूमी हा प्रदेश हा आसामचा एक भाग ठरवला गेला होता. नागांना ह्यात समाधान नव्हते. तेव्हा त्याचा असंतोष नाहीसा व्हावा म्हणून १९६० मध्ये भारत सरकारने त्याना त्याचे वेगळे राज्य स्थापन करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार १९६३ सालच्या डिसेंबरमध्ये नागप्रदेशाचे वेगळे राज्य अस्तित्वात आले. परंतु एवढ्यानेही काही असंतुष्ट नागपुढाऱ्याचे समाधान झाले नाही. त्याना परकीय व अन्य काही उपद्व्यापी लोकाची फूस मिळाल्यामुळे त्यानी नागभूमीत मोठ्या प्रमाणावर बंडाळ्या आणि घातपाती कृत्ये सुरू केली. भारत सरकारने खंबीरपणाने हे उठाव मोडून काढले. आणि अशात अशा नागभूमीत शाती आणि प्रशासन उभारण्याचा प्रयत्न केला. १९६९ साली तेथे झालेल्या दुसऱ्या निवडणुकीत तेथील विधानसभेत ५२

सदस्याची निवड शांतीपूर्ण वातावरणात झाली. याच सुमारास चौथी पंचवार्षिक योजनादेखील नागभूमीला लागू करण्यात आली. आज नागभूमी हे भारतीय संघराज्यातील १६ वे घटक राज्य आहे.

**लोक आणि लोकाचार**

नागभूमीत बऱ्याच आदिवासी जमाती वस्ती करून आहेत. प्रमुख जमातींत पुष्कळ पोट-जमाती आहेत. या लहानशा प्रदेशातील थोड्याशा लोकांची वैशिष्ट्ये मात्र एक प्रकारची सांगता येणार नाहीत. साऱ्या नागांची शरीरयष्टी, उंची एक-सारखी नाही. त्यांचे रंगरूपही एकसारखे नाही शेतीची पद्धत आणि राहाणी यात-देखील जातीजातींत भिन्नता आहे. त्यांच्या जातीजमातींतील शासन पद्धती अशीच भिन्न-भिन्न आहे. कुठे कठोर हुकुमशाही तर कुठे अतिरेकी लोकशाही दृष्टीस पडते. नागा लोकांची खेडी अशीच वैचित्र्यपूर्ण आहेत. त्यांच्यातील अंगामी नामक जमात बरीच पुढारलेली आहे. त्यांच्या मुलुखात सुंदर घर, सुपाक जमीन, उत्तम खत, पाण्याचा चांगला निचरा, टेकड्यावर भाताची चांगली शेती, चारही दिशांना बांधलेली घरे अशी व्यवस्था आहे. त्यांची खेडी व्यवस्थित आखणी करून वसलेली दिसतात. ही खेडी सपाटीवर नसून डोंगराच्या घळीमध्ये व डोंगराच्या उंचवट्यावर वसवलेली आहेत.

नागांची घरे तशी मोठी प्रशस्त असतात. झोपडीसारखीच ती दिसतात. प्रत्येक घराच्या प्रवेशद्वारावर माणसाच्या कवटीचा सांगाडा आणि शिंगे असतात. घराण्यातील एखाद्या पराक्रमी पुरुषाने केलेल्या शौर्यशाली कृत्याचे ते प्रतीक मानले जाते.

**खाणे-पिणे व राहणी**

नागांचे मुख्य अन्न भात आहे. त्याशिवाय अनेक प्रकारचे मासही ते खातात. अलिकडे त्यांच्यात चहा, कॉफी, दूध या पेयांचा प्रसार झालेला आहे. तांदुळा-पासून ते बीर-रूही—तयार करतात. ही 'रूही' नागांना अत्यंत प्रिय असते. या पेयापासून त्यांना थोडासा कैफ येतो आणि उत्तेजनही मिळते.

डोंगराळ प्रदेशाच्या आतभागात व घनदाट जंगलात राहणारे आदिवासी नागा अर्धनग्न अवस्थेतच राहतात. परंतु अन्यत्र राहणाऱ्या नागांना रंगीबेरंगी कपडे परिधान करण्याची आवड आहे. काही जमातीत तर कपड्यांच्या बाबतींत नागा-लोक फारच चोखंदळ दिसतात. अत्यंत तलम, कलाकुसरयुक्त असे कपडे ते

वापरतात. ते अधिक मोहक दिसावेत म्हणून हस्तिदंती कर्णभूषणे, शिंपा' कवड्या, पोवळे, याच्या माळा ते घालतात. काचेचे मणी, जनावराचे केस, पक्ष्याची पिसे, बांबूचे किंवा हाडाचे तुकडे यापासून विविध प्रकारच्या वस्तू बनवूनही त्यानी हे लोक आपली शरीरे शृंगारीत करतात. ख्रिस्ती मिशनऱ्याच्या सहवासामुळे त्याच्या वेषभूषेत बराच अद्ययावतपणा आता आलेला दिसतो.

काही जमातींमधील नागलोक उंच, देखणे, सुदृढ आणि गव्हाळी रंगाचे असतात. त्याचे कपाळ रुंद, डोळे घारे व दृष्टी भेदक असते इतर काही लोक लहान बांध्याचे, काळ्यासावळ्या वर्णाचे, बसक्या नाकाचे आणि बारीक डोळ्याचे असतात. सामान्यपणे नाग स्त्रिया ठेंगण्या व स्थूल असतात.



नागा पुरुष

नागलोक कुटुंबवत्सल आणि प्रेमळ आहेत. आपले कुटुंब, आपली जमात आणि आपला ग्रामीण समाज यावर नागा माणूस मनःपूर्वक प्रेम करतो. आपल्या संस्कृतीत कुणी हस्तक्षेप केला तर त्याला तो आवडत नाही. आपल्या जमिनीवर त्याचे प्रेम असते. शेती करण्याची परंपरागत पद्धत आजही तेथे दिसते. शेतसाऱ्याची पद्धत, आणि शेतीमधील पिके ही जुन्या परंपरेला धरूनच आहेत. परंतु अलिकडे त्यांच्यात सुधारणा होऊ लागली आहे. त्याच्या ग्रामीण संस्कृतीत गावगाड्यातील न्यायदानाची पद्धत पारंपारिकच आहे. खेडेगावातून गावचे तंटे निकालात काढून न्याय देणारी मंडळे आजही अस्तित्वात आहेत.

भारताच्या विविध भागात वसत असलेल्या विविध जातींतील आदिवासींप्रमाणेच नाग जमातींतील लोकाच्याही भ्रामक अंध-श्रद्धाळू अशा काही कल्पना आहेत. कोण्या तरी श्रेष्ठ देवाने हे विश्व उत्पन्न केले. तोच देव मनुष्यमात्राच्या

जीवनाचा नियंता आणि शासक आहे. त्या देवाच्या हाताखाली अनेक देवता आहेत आणि भूते-खेतेदेखील आहेत अशी नागाची धारणा आहे. वृक्ष, नदी टेकड्या आदी ठिकाणी वास करणाऱ्या देवताही तो मानतो. साऱ्या सृष्टीत अपार शक्ती असलेले एक अदृष्ट चैतन्य आहे, भुताखेताना वश करण्याची शक्ती पुरोहित आणि वैदू याच्यात आहे, यावर नागाचा विश्वास आहे. पुरोहिताना ते 'टेवो' म्हणतात. ते ही भूते पळवून लावतात. शिवाय रोग निर्माण करणाऱ्या दुष्ट शक्तींना ते हद्दपार करतात; तसेच उपकारकर्त्या देवतांना ते आपल्याकडे वश करून घेतात अशी त्याची श्रद्धा आहे. टेवोच्या मंत्रामुळे शेती चागली पिकते, प्रजा चागली निर्माण होते, आणि जो कामधंदा करतो त्याची चागली भरभराट होते अशा त्याच्या कल्पना आहेत. मरणोत्तर काय होते याबद्दल साऱ्या नागाचे एकमत नाही, परंतु आत्मा अमर आहे हे मात्र सर्वजण मान्य करतात. त्याच्यातील मर्तिक-प्रथेतही भिन्नता आढळते. कुणी प्रेत पुरतात, कुणी जाळतात, कुणी उघड्यावर टाकतात, तर कुणी शवच्छेदनही करतात.

प्राचीन काळी नागालोक एक मोठा समारंभ करीत असत. हा समारंभ यज्ञासारखा असे. जेवणावळी, भारी कपडे वगैरे त्या समारंभाचे वैशिष्ट्य असे. पत्नीशिवाय हा समारंभ साजरा होऊ शकत नसे. तो बराच दिवस चाले. जीवनात ऐश्वर्य आणि मरणोत्तर उत्तम गती प्राप्त व्हावी हा उद्देश या समारंभाच्या मागे असे. हा समारंभ करणारा नागा त्याच्या समाजात प्रतिष्ठित समजला जाई.

माणसाचे शिर तोडणे ही चालही नागात प्रचलित होती. त्याचेही एक तत्त्वज्ञान त्याच्यात रूढ होते. त्यांच्या समजुतीप्रमाणे माणसाचा आत्मा किंवा चैतन्यशक्ती ही त्याच्या डोक्यात असते. तेव्हा दुसऱ्या गावातील माणसाचे शिर कापून ते आपल्या गावात आणले म्हणजे आपल्या गावातील चैतन्यशक्ती वाढते अशी त्याची श्रद्धा असते. असे शिर कापून आणल्याने गाव सुखी होते, शेती-भाती चागली होते आणि जनावरे अधिक काम करतात असेही त्याना वाटते. लाब केस असणाऱ्या स्त्रीचे शिर कापून आणले असता शेतीभाती फारच चागली पिकते असेही ते मानतात. अशा प्रकारच्या अंधश्रद्धा किंवा भोळ्या समजुती नागाच्या जमातींमधून प्रचलित आहेत. एखाद्या तरुणाने जर दुसऱ्या गावात जाऊन एखाद्याचे शिर कापून आणले तर तो महान पराक्रमी मानला जातो आणि त्याला सुंदर वधूचा लाभ होतो. याउलट ज्याच्या हातून असा पराक्रम घडला नसेल त्याचे लग्न होणे कठीण होत असे. तेव्हा विवाहित व्हावयाचे असेल तर शिरच्छेदात

पराक्रम केला पाहिजे; असा एक प्रकारचा आदेशच त्यांच्या जमातीत अस्तित्वात होता. परंतु ही घोर प्रथा ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर संपुष्टात आली आहे.

**विवाह-प्रथा**

बहुतेक सर्व नाग जमातींमध्ये वयात आल्यावरच मुलामुलींची लग्ने होतात. ती बहुधा स्वत:च आपले जोडीदार निवडून लग्ने ठरवतात. आई-वडिलांची संमती घेतात आणि एकत्र राहू लागतात. काही महिने असे राहून वधूवर एकमेकांची पारख करतात आणि स्वभाव जुळले तर लग्न करतात. स्वभावभिन्नता दिसली तर वेगळे होतात. काही जमातींत वर वधूच्या आई-बापांना गाई, डुकरे, दारु अशी भेट देतात. ज्याला हे देणे शक्य नसेल तो एक वर्षभर वधू-पित्याच्या घरी काम करतो. त्या कामात तो लायक दिसला तर त्या वधूशी त्याचे लग्न होते. नातेवाइकांना कोंबडीचे जेवण देऊन भरपूर दारु दिली की त्याचे लग्न पूर्ण होते. इतर काही विधी करावे लागत नाहीत. बहुतेक नागजमातीत एकपत्नीत्वाची प्रथा आहे. परंतु सेमा जमातीत मात्र अनेक पत्नीत्व रूढ आहे. यांच्यात घटस्फोट सुलभ आहे. स्त्रीचे अनैतिक वर्तन हे त्याचे मुख्य कारण असते. पण स्वभाव न जुळणे हे कारणही घटस्फोटाला पुरते.

'मोरुंग' ही नागसमाजातील एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे. मोरुंग म्हणजे सामुदायिक शेजघर. प्रत्येक गावात तरुण मुलांची व मुलींची वेगवेगळी अशी मोरुंग असतात. एखादी वृद्ध स्त्री तेथे त्यांच्यावर देखरेख करते. ती मुलांना जुन्या गोष्टी सांगून त्यांना चांगले वळण लावते. त्यांच्यामधील आत्मविश्वास, शौर्य, व्यक्तिस्वातंत्र्य, शिस्त, सहकार्य इत्यादी गुणांची जोपासना असा मोरुंगमध्ये होते. आपल्या जन्माच्या जोडीदाराची निवडही हे तरुण येथेच करतात.

नागांची कुटुंबपद्धती पितृसत्ताक आहे. या लोकांत फार पूर्वीपासून विभक्त कुटुंबपद्धती चालू आहे. लग्न झाल्याबरोबर मुलगा वेगळे बिऱ्हाड करतो. नाग स्त्रियांना कुटुंबात व समाजात बराच मान असतो. त्यांच्या संमतीवाचून पुरुष कोणतेही काम करीत नाहीत. स्त्रियाच अप्रत्यक्षपणे समाज-संचलनाचे काम करीत असतात.

**चालीरीती**


नागांमध्येही अनेक चालीरीती रूढ आहेत. नवीन मूल जन्माला आल्यावर किंवा गावातील प्रतिष्ठित व्यक्तींचा मृत्यू झाल्यावर, तसेच भूकंप, ग्रहण, आग अशा प्रसंगी गावाचे सर्व व्यवहार बंद ठेवण्याची चाल या लोकांत आहे. या चालीला

'गेन्ना' असे म्हणतात. अशा वेळी दुसऱ्या गावातील लोकांना गावात यायला बंदी असते. नवीन घरात प्रवेश केल्यानंतरही तीन ते चार दिवस गेन्ना पाळतात. त्या अवधीत दुष्ट शक्तींचे उच्चाटन करण्यासाठी काही विधी केले जातात. एखादा मनुष्य पाण्यात बुडून किंवा अंगावर झाड पडून, किंवा वाघाच्या तडाख्यात सापडून मेला तर त्याच्या कुटुंबातील लोक घर सोडून जातात. महिनाभर जंगलात भटकतात आणि नंतर दुसऱ्या जागी नवे घर बांधतात. घर बांधायला जागा निवडल्यावर मालकाला शुभ स्वप्नच पडावे लागते. ते पडले तरच घर बांधले जाते.

नाग स्त्रियांना गोंदवून घेण्याची फार हौस आहे. त्या सर्व शरीरावर गोंदवून घेतात. पूर्वी तर गोंदवून घेतल्याशिवाय लग्नच करता येत नसे.

**सण–समारंभ**

नागांचा वर्षारंभ उन्हाळ्यात मे महिन्याच्या सुरुवातीला येतो त्याआधी शेतात पेरणी झालेली असते 'मोत्सू' नावाच्या नृत्याने हा सण साजरा केला जातो. त्या वेळी प्रत्येक जण आपापल्या घराची आणि गावाचीही साफसफाई



मोरुंग

करतात. नृत्यवेश, अलंकार आणि विविध आयुधे यानाही उजाळा देतात. उत्सव-प्रसंगी तादुळाची बीर–'रूही' पिऊन तरुणतरुणी धुंदपणे नाचतात. दोन दिवस भरपूर मौजमजा चालते. या दिवसात स्वैरवर्तनाला मुभा असते.

'पौकपट्टगी' नावाचा उत्सव भाताची कापणी झाल्यानंतर साजरा केला जातो. या वेळी नाना तऱ्हेचे खेळ होतात. बैल व रेडे याच्या शर्यती लावतात. त्यांना रानोमाळ पळायला लावून बलदंड पुरुष त्याचा पाठलाग करून त्याना पकडतात.

'ओईनिवु' नावाचा उत्सव शेतात धान्य तयार होते त्या वेळी साजरा करतात. पिकाला नागाच्या भाषेत 'ओईनिवु' असे म्हणतात. सामान्यत: सप्टेंबरच्या सुमारास पीक तयार होते. त्या महिन्यातल्या पौर्णिमेचा चंद्र पाहून, धान्यलक्ष्मीचे उपकार आठवून हा उत्सव सुरू होतो. गावचा प्रमुख सात तऱ्हेच्या धान्याची कणसे किंवा ओंब्या तोडून आणून आपल्या घरापुढल्या अंगणात टांगून ठेवतो. एखादा पशू बळी दिला जातो व उत्सवारंभ होतो. खाणेपिणे, नाचगाणे दिवसभर चालते. इष्टमित्र, सगेसोयरे या वेळी परस्पराना भेटीदाखल वस्त्रे, अलंकार इत्यादी वस्तू व पशूचे मास देतात.

## भाषा आणि साहित्य

विविध जमातींच्या नागामध्ये विविध प्रकारच्या बोलीभाषा प्रचलित आहेत. ह्या विविध प्रकारच्या भाषा तिबेटी-ब्रह्मी वाशिक भाषेतून उत्पन्न झालेल्या आहेत. या भाषा बोलीच्या स्वरूपातच अस्तित्वात आहेत. त्यामुळे नागा लोकाच्या लोकभाषेत कथा, गीते इ. प्रकारचे लोकसाहित्य बरेच असले तरी ते लोकाच्या स्मरणात व पाठांतरातच आहे. तोंडोतोंडीच त्याचा प्रसार झालेला आहे. म्हणून त्याच्या भाषेतील पुस्तके उपलब्ध नाहीत. बराच काळ शिक्षण तेथे नव्हतेच. त्यामुळेही ग्रंथरूपाने साहित्यनिर्मिती झालेली नाही. तथापि आपल्या भावभावना व्यक्त करणारी प्रेमगीते, शौर्यगीते, विवाहगीते, शेतीत काम करताना म्हणावयाची गीते त्याच्यात विपुल आहेत त्याच्यात अमुक एकच अशी भाषा नसल्यामुळे व लेखनाच्या आवश्यकतेवर भर दिला न गेल्यामुळे त्याना लिपीचीही गरज भासली नाही. व्यवहारात नागा लोक असामी भाषेचा उपयोग करतात. ख्रिस्ती मिशनऱ्याच्या सहवासाने व त्यानी सुरू केलेल्या शिक्षणाने अलीकडे काही लोक इंग्रजी-चाही वापर करतात. नागाच्या लोकसाहित्यात भक्तिपर वाङ्मय फारच क्वचित आढळते. सर्व भारतीयाना आदरणीय असलेले राम, कृष्ण किंवा इतर देवता आणि साधुसंत याच्याविषयी त्यांच्या कथागीतातून काहीच आढळत नाही. अन्य आदि,

जमातींप्रमाणेंच हिंदूंच्या देवधर्माबद्दल त्यांना तेवढा आपलेपणा नसण्याची शक्यता आहे. नागांच्या लोकगीतामध्ये प्रेमभावना व्यक्त करणारी प्रतिभा विशेषत्वाने दिसते. ही प्रेमकाव्ये त्याच्या संगीतातून गायली जातात. दळणकांडण करताना तरुणी मोठ्या तन्मयतेने प्रेमगीते गात असतात.

नागाच्या लोकभाषेत पुष्कळ लोककथा आहेत. त्या अद्भूतरम्यता आणि चमत्कार यांनी जशा भरलेल्या आहेत तशाच नीती, आदर्श आणि व्यवहार याच्या विषयी मार्गदर्शन करणाऱ्याही आहेत.

**कलाप्रिय नागा**

नागाच्या रानटीपणाची, तसेच त्यांच्या क्रौर्याची बाहेरच्या जगात जेवढी प्रसिद्धी झाली आहे तेवढी त्याच्या रसिकतेची व कलाप्रियतेची झालेली नाही. वस्तुतः सर्वच नागा क्रूर व हिंसक नाहीत. नागा लोक विनोदप्रिय आहेत. तसेच, रसिक आहेत. सर्वच आदिमजमातींप्रमाणेच त्याच्यातही नृत्यसंगीताची खूप आवड आहे. त्याच्यातील पुष्कळशी प्रेमगीते ही नृत्य-संगीतासाठीच निर्माण झालेली आहेत. नाग तरुणतरुणी मोरुंगमधील जीवनात नृत्य-गीताचा आनंद लुटतातच, पण विविध प्रकारची कामे करतानाही गात असतात. नागामध्ये विविध जातीजमातींमध्ये विविध प्रकारची नृत्ये प्रचलित आहेत. आओ जमातीचे अंगामल्ल नृत्य, मत्सनृत्य ही पुरुषाची नृत्ये आहेत, तर तानाग्लामाय, तिंगकूमझेइना ही काबूई नागा स्त्रियाची नृत्ये आहेत. अंगामी नागा पुरुष नानू नृत्य करतात तर तंगकुल नागा पुरुष मारनमाहोन नावाचे नृत्य करतात. हानसेनगाय नावाचे नृत्य



जेमी नागा तरुणी

काबूयी नागांमधील स्त्रीपुरुष मिळून करतात, तसेच सेमा जमातीतील स्त्रीपुरुष गेन्ना

नृत्य करतात. आओ नागामध्ये अंगोकाझू, अंगमाल्ह ही स्त्रीपुरुषांनी मिळून नाचावयाची नृत्ये आहेत. अशाप्रकारे बरीच नृत्ये त्यांच्यात प्रचलित आहेत. ही नृत्ये करण्याचे प्रकारही पुष्कळ आहेत. कुकी नागामध्ये सुतलाम नावाचे एक नृत्य आहे. या नृत्याचे वेळी चार मोठ्या बांबूंचा एक मोठा चौकोन जमिनीवर तयार केला जातो. वादक मोठमोठ्याने ढोल वाजवित असतो. ढोलाच्या तालावर बांबूचा चौकोन उघडला जातो व बंद केला जातो. चौकोन उघडला की नर्तक एक पाऊल चौकोनात टाकतो आणि तो बंद केला की एक पाऊल बाहेर टाकतो. एकापेक्षा अधिक नर्तक ज्यावेळी हे नृत्य करतात तेव्हा हे बांबूनृत्य कसरतीप्रमाणेच प्रेक्षणीय ठरते.

रेंगमा जमातीमधील नागा आरवू नावाच्या उत्सवाच्यावेळी आपल्या मस्तकावर पिसे लावून आणि कवड्यांनी गुंफलेले वस्त्र नेसून पाच दिवस नृत्य करतात. दिमासाकाचारी नावाच्या नागा जमातीमध्ये दिमासाकाचारी नावाचेच नृत्य चालते. सणसमारंभाच्यावेळी हे नृत्य करतात. वीस वीस—तीस-तीस स्त्रीपुरुष या नृत्यात भाग घेतात. साथीला ढोल आणि या जमातीची विशिष्ट वाद्ये असतात. नागा पुरुषांचे अत्यंत आवडते असे युद्धनृत्य चालते. सर्वजण दाओ, भाले, ढाली इत्यादी शस्त्रे घेऊन सज्ज होतात.त्यांची वैशिष्ट्यपूर्ण आणि सुंदर अशी शिरस्त्राणे घालतात. ही शिरस्त्राणे वेताची केलेली असतात. त्यांना काळा रंग दिलेला असतो. आणि ती पक्षांची पिसे व बकरीचे केस लावून सजवलेली असतात. हे नर्तक मण्यांच्या माळा, हस्तिदंताची किंवा लाकडाची कडी, कर्णभूषणे इत्यादी प्रकारचे अलंकार या वेळी घालतात त्यांच्या अंगावरची तोटकी वस्त्रे काळ्या अथवा निरनिराळ्या भडक रंगाची असतात. या वेषभूषेत हे नर्तक उग्रभेसूर दिसतात त्यांच्या हातातील ढाली ५ ते ६ फूट लांबरुंद असतात. त्या वेताच्या किंवा बांबूच्या बनवलेल्या असतात. [आणि त्यावर वाघाचे किंवा अस्वलाचे कातडे मढवलेले असते. युद्धनृत्याच्या वेळी वाजविण्याचे नागाचे लाकडी ढोल एवढे प्रचंड असतात की, त्याचा धीरगंभीर ध्वनी दूर अंतरापर्यंत पोचतो. एकाच वेळी अनेक वादक हा ढोल बडवित असतात.

युद्धदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नागालोक केदोहोल नागाचे नृत्य करतात. आणि युद्धात विजय मिळाल्यावरही आनंदाने व बेहोषीने नृत्य करतात.

**कलाकुसर**

नागा लोकांना कलाकुसर आणि चांगल्या वस्त्राचीही आवड आहे.

बहुतेक नागा स्रियांना विणण्याची कला अवगत असते. या भागात जंगल विपुल असल्यामुळे लाकडाच्या बाहुल्या व वेताच्या अनेक वस्तू हे लोक बनवितात. लाकडाच्या बाहुल्या, बांबूचे नक्षीदार प्याले, मातीची डौलदार भाडी आणि विविध प्रकारची शिरस्राणे सौंदर्यपूर्ण असतात.

नागभूमीची राजधानी कोहिमा नामक शहरात आहे. कोहिमा हे शहर समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीवर पर्वतपठारावर वसलेले आहे. 'कियु–ही–मिया' याचा अपभ्रंश कोहिमा असा झालेला आहे. याचा अर्थ कियुहिचे लोक असा होतो. कियुही नावाचे एक झाडही या डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर आढळते. कोहिमा हे ठिकाण निसर्गसौंदर्याने नटलेले आहे. याच्या दक्षिणेला १०,००० फूट उंचीची पर्वतश्रेणी उभी आहे. उत्तर–पश्चिमेकडे दिमापूरपर्यंत जाऊन मिळणारी मोठी उतरण आहे. पश्चिमेला पुलबदज़्क जाप्वो नामक पर्वत आहेत. उत्तरेकडील छदेमा आणि जस्सामी पर्वत जंगलानी घेरलेले आहेत.

### विकासोन्मुख नागभूमी

स्वातंत्र्यानंतर उपेक्षित राहिलेल्या नागभूमीकडे भारत सरकारचे लक्ष वेधले असून आता तेथे विकासाची अनेक कामे सुरू झालेली आहेत. शेती हाच तेथील मुख्य व्यवसाय असल्यामुळे नव्या पद्धतीची शेती करून उत्पादन कसे वाढवावे याचे प्रशिक्षण देण्यासाठी तेथे शासनातर्फे बरीच कृषिकेंद्रे उघडण्यात आली आहेत. रासायनिक खताचा वापर कसा करावा हे नागा शेतकऱ्याना प्रात्यक्षिकासह दाखवले जाते. अलीकडील काही वर्षांत शेतीखालील जमिनीतही वाढ झालेली आहे. ट्रॅक्टरसारखी आधुनिक शेतीची साधनेही त्याना उपलब्ध करून दिली जात आहेत.

पशुपालन हाही नागाचा एक प्रमुख व्यवसाय आहे. बहुतेक प्रत्येक नागा कुटुंबात मिथुन, बकरी, कोंबडी आणि डुकरे पाळली जातात. पशुपालनही शास्त्रीयदृष्ट्या कसे करावे व त्यापासून उत्पादन कसे वाढवावे हेही नागा शेतकऱ्याना आता शासनामार्फत प्रात्यक्षिकासह शिकवले जाते. या डोंगराळ भागात दळणवळणासाठी आता बऱ्याच सडका आणि पूल बांधण्यात आले आहेत. शिक्षणाचाही प्रसार या भागात बऱ्याच प्रमाणावर केला जात आहे. हायस्कूल्स्, मिडल स्कूल्स् ही ठिकठिकाणी उघडण्यात आली असून दोन महाविद्यालयेही काढण्यात आली आहेत.

उद्योगधंद्याच्या योजनाही या भागात कार्यान्वित झालेल्या आहेत. मोकोकच्युंग जिल्ह्यात कागद बनविण्याचा कारखाना सुरू झाला आहे. कोहिमा जिल्ह्यात रेशीम तयार करण्याची बरीच केंद्रे सुरू झाली आहेत. काही भागात वीज पोहोचली असून एक जलविद्युत केंद्र स्थापित करण्याची योजना कार्यान्वित झाली आहे.

नागभूमीचा विकास वेगाने सुरू आहे.

# नृत्यभूमी मणिपूर

मणिपुरा—साना—लेइमाथोल
चिहना कोयना पानसाबा
हूना कोया पान्नगवया...

माझ्या प्रिय मणिपूरा ! अरे, तुला सुवर्णभूमी बनण्याचे भाग्य लाभलेले आहे. तू केवढा गौरवशाली आहेस ! तुझ्या भोवती चहूबाजूंनी उंच उंच पहाडाची मालिका पसरलेली आहे. तुला निसर्गानेच सुरक्षित ठेवले आहे...

एका मणिपुरी कवीने आपल्या प्रियतम जन्मभूमीची गौरवगाथा गायलेली आहे.

मणिपूर म्हणजे चित्रागदेचे माहेर. महाभारतामध्ये चित्रागदेचा उल्लेख आढळतो. चित्रागदा ही मणिपूरची राजकन्या. अर्जुन वनवासात असताना भारत भ्रमण करीत करीत मणिपूर नामक सृष्टिसौंदर्याने संपन्न असलेल्या या प्रदेशात आला होता. त्यावेळी चित्रागदेशी प्रेम जुळून त्याचा विवाह झाला. पुढे त्याना बभ्रुवाहन नावाचा मुलगा झाला, अशी आख्यायिका आहे. युधिष्ठिराने केलेल्या राजसूय यज्ञानंतर सोडलेला यज्ञ-अश्व मणिपूर प्रदेशात आला असताना याच बभ्रुवाहनाने तो अडविला. ह्यावरून अर्जुनाचे व बभ्रुवाहनाचे तुंबळ युद्ध झाले. बभ्रुवाहनाने या युद्धात अर्जुनाचा पराभव केला आणि आपले अपूर्व युद्धकौशल्य प्रकट केले. बभ्रुवाहन हा आपलाच पुत्र आहे याचे विस्मरण मध्यंतरीच्या काळात अर्जुनाला झाले होते. या युद्धाच्या निमित्तानेच पितापुत्राची गाठभेट झाली. मणिपूर विषयीचा हा उल्लेख महाभारतात आहे. म्हणजेच मणिपूरची भूमी ही फार प्राचीन आहे.

मणिपूरच्या उत्पत्तीविषयी याहूनही प्राचीन अशी एक पुराणकथा या भागात प्रचलित आहे :

फार फार वर्षांपूर्वी या भागात समुद्रच होता. या समुद्रातच आजच्या मणिपूरचा प्रदेश होता. कालान्तराने निसर्गतत्त्वानुसार या ठिकाणी बरेच परिवर्तन घडले

आणि समुद्राचा तळ वर येऊन भूमी तयार झाली. भूगर्भ शास्त्रज्ञाच्या मतानुसार येथील समुद्राचे पाणी आटून गेले असावे किंवा दुसरीकडे वाहून गेले असावे. परंतु पुराणकथा अशी आहे की अनेक देवदेवतानी येथे असलेल्या समुद्रात माती टाकून समुद्र आटवला आणि हा भूभाग तयार झाला. पुढे एकदा शंकर-पार्वती रासनृत्य करण्याच्या उद्देशाने या सुंदर भूमीत आले. परंतु त्याना कोरडा आणि सपाट प्रदेश कुठेच आढळला नाही, म्हणून शंकराने आपल्या हातातील त्रिशुळाने भोवतालच्या डोंगराला छिद्र पाडले; त्यातून उरलेले पाणी वाहून गेले व वसाहतीला योग्य अशी जमीन निर्माण झाली.

भारतात आर्यांनी वसाहती केल्या, त्याच्यापूर्वीच मणिपूरमध्ये एक स्वतंत्र व सुसंस्कृत राज्य अस्तित्वात होते, असा पुरावा उपलब्ध झालेला आहे.

मणिपूर याचा अर्थ मण्याचा देश असा आहे. यासंबंधीही एक पुराणकथा प्रचलित आहे : पाताळात वसती करणाऱ्या नागदेवता या देशात विहार करण्यासाठी येत असत. या प्रदेशातील सौंदर्यावर या देवता एवढ्या लुब्ध झाल्या होत्या की त्यानी ता प्रदेशावर रत्नमण्याचा वर्षाव केला. यावरून या भूभागाला मणिपूर असे म्हणण्यात येऊ लागले.

दुसऱ्या एका पुराकणथेनुसार शिवपार्वती नृत्य करण्यासाठी या भूमीत आले असता त्याचे नृत्य पाहाण्यासाठी सर्व देवदेवता येथे आल्या होत्या. त्यावेळी सात दिवस आणि सात रात्री शिवपार्वती याचे नृत्य झाले. या नृत्याच्यावेळी पाताळलोकीचा नागराजा अनंत याने आपल्या मस्तकातील रत्नमण्याच्या प्रकाशाने हा सारा प्रदेश प्रकामय करून टाकला होता. त्यावेळीही या प्रदेशाला मणिपूर असे नाव प्राप्त झाले असे म्हणतात. अनंत नागाला शंकराने प्रसन्न होऊन तेथील राजपद बहाल केले.

या आख्यायिका खऱ्याखोट्या कशाही असल्या तरी मणिपूर हा भारताच्या उत्तर-पूर्व सीमेवर असलेला प्रदेश अति सुंदर आणि रम्य आहे यात शंका नाही.

मणिपूरच्या उत्तरेला नागभूमी आहे तर दक्षिणेला ब्रह्मदेश आणि मिझोरमची लुशाई पहाडाची मालिका आहे. पश्चिमेला आसाम व पूर्वेला ब्रह्मदेश याचा शेजार आहे. या प्रदेशाला पूर्वी मेकाल्म, कासी, मकेली, मादली, भोगलन इत्यादी अनेक नावे होती. पेम्बरटन नामक एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मतानुसार ब्रह्मदेशातील बर्मी लोक मणिपूरला ‘ काये ’ म्हणत असत. कछाडी लोक ‘ मोगली ’ म्हणत

असत, असामी लोक 'मेकली' म्हणत असत, आणि शान लोक 'कास्से' म्हणत असत. परंतु मणिपूर हे नाव या भागाला केव्हापासून अस्तित्वात आले याबद्दल मात्र विद्वानांमध्ये मतभिन्नता आहे. उपलब्ध प्राचीन लेखावरून या भूमीला मणिपूर हे नाव आधुनिक कालातच मिळाले आहे असे अनुमान काढले जाते.

आजचे मणिपूर हे भारतीय संघराज्यातील एक स्वतंत्र राज्य म्हणून २१ जानेवारी १९७२ पासून अस्तित्वात आलेले आहे. हा प्रदेश उंच उंच डोंगर-रागानी वेढलेला आहे. अडीच हजार ते दहा हजार फूट उंचीच्या या डोंगररागा आहेत. या राज्याचे क्षेत्रफळ २२,३५६ वर्ग किलोमीटर आहे. आणि तेथील लोकसंख्या १०,७२,७५३ आहे. 'इम्फाळ' नगरी ही या राज्याची राजधानी आहे.

या छोट्याशा राज्यातही बहुतेक सर्व धर्मांचे लोक राहातात. त्यांत हिंदु धर्मियाची संख्या सर्वांत अधिक म्हणजे ४,८१,११२ इतकी आहे. त्या खालोखाल ख्रिस्ती धर्मियाची १,५२,०४३ आहे. मुस्लिम ४८,५८८ आहेत, तर जैन ७७८, बौद्ध ३२५ आणि शीख ५२३ आहेत.

या राज्यात एक लाखाहून अधिक वस्ती असलेले केवळ एकच शहर असून ५० हजारावर वस्ती असलेली चार शहरे आहेत आणि १८६६ इतकी लहान गावे अथवा खेडी आहेत. इम्फाळ हेच राजधानीचे मोठे शहर असून त्याची लोकसंख्या १,००,६०५ इतकी आहे.

मणिपूर राज्यात मणिपूर नॉर्थ, मणिपूर साउथ, मणिपूर वेस्ट, मणिपूर इस्ट आणि मणिपूर सेंट्रल असे पाच जिल्हे आहेत.

पूर्वी साक्षरतेच्या दृष्टीने हा प्रदेश मागासलेलाच होता. परंतु अलीकडे शिक्षणाचा प्रसार मोठ्या वेगाने होत असून सध्या तेथील साक्षरतेचे प्रमाण ३२·८० टक्के आहे.

या प्रदेशातील लोकाचा मुख्य व्यवसाय शेती हाच असून सुमारे ८५ टक्के लोक शेतीभातीवरच अवलंबून आहेत. भात हे येथील मुख्य पीक आहे. त्याशिवाय कापूस, नीळ, हळद इत्यादी पिकेही काढली जातात. तरतऱ्हेच्या फुलझाडाची उद्यानेही मेहनतपूर्वक केली जातात. आणि फुलाची व फुलझाडाची येथून निर्यातही केली जाते.

जंगलाची विपुलता असल्यामुळे बाबू, वेत व अन्य तऱ्हेच्या लाकडांपासून

आणि समुद्राचा तळ वर येऊन भूमी तयार झाली. भूगर्भ शास्त्रज्ञाच्या मतानुसार येथील समुद्राचे पाणी आटून गेले असावे किंवा दुसरीकडे वाहून गेले असावे. परंतु पुराणकथा अशी आहे की अनेक देवदेवतांनी येथे असलेल्या समुद्रात माती टाकून समुद्र आटवला आणि हा भूभाग तयार झाला. पुढे एकदा शंकर-पार्वती रासनृत्य करण्याच्या उद्देशाने या सुंदर भूमीत आले. परतु त्याना कोरडा आणि सपाट प्रदेश कुठेच आढळला नाही, म्हणून शंकराने आपल्या हातातील त्रिशुळाने भोवतालच्या डोंगराला छिद्र पाडले; त्यातून उरलेले पाणी वाहून गेले व वसाहतीला योग्य अशी जमीन निर्माण झाली.

भारतात आर्यांनी वसाहती केल्या, त्याच्यापूर्वीच मणिपूरमध्ये एक स्वतंत्र व सुसंस्कृत राज्य अस्तित्वात होते, असा पुरावा उपलब्ध झालेला आहे.

मणिपूर याचा अर्थ मण्याचा देश असा आहे. यासंबंधीही एक पुराणकथा प्रचलित आहे : पाताळात वसती करणाऱ्या नागदेवता या देशात विहार करण्यासाठी येत असत. या प्रदेशातील सौंदर्यावर या देवता एवढ्या लुब्ध झाल्या होत्या की त्यानी ता प्रदेशावर रत्नमण्याचा वर्षाव केला. यावरून या भूभागाला मणिपूर असे म्हणण्यात येऊ लागले.

दुसऱ्या एका पुराकणथेनुसार शिवपार्वती नृत्य करण्यासाठी या भूमीत आले असता त्याचे नृत्य पाहाण्यासाठी सर्व देवदेवता येथे आल्या होत्या. त्यावेळी सात दिवस आणि सात रात्री शिवपार्वती याचे नृत्य झाले. या नृत्याच्यावेळी पाताळलोकींचा नागराजा अनंत याने आपल्या मस्तकातील रत्नमण्याच्या प्रकाशाने हा सारा प्रदेश प्रकाशमय करून टाकला होता. त्यावेळीही या प्रदेशाला मणिपूर असे नाव प्राप्त झाले असे म्हणतात. अनंत नागाला शंकराने प्रसन्न होऊन तेथील राजपद बहाल केले.

या आख्यायिका खऱ्याखोट्या कशाही असल्या तरी मणिपूर हा भारताच्या उत्तर-पूर्व सीमेवर असलेला प्रदेश अति सुंदर आणि रम्य आहे यात शंका नाही.

मणिपूरच्या उत्तरेला नागभूमी आहे तर दक्षिणेला ब्रह्मदेश आणि मिझोरमची लुशाई पहाडाची मालिका आहे. पश्चिमेला आसाम व पूर्वेला ब्रह्मदेश याचा शेजार आहे. या प्रदेशाला पूर्वी मेकालम, कासी, मकेली, मादली, मोगलन इत्यादी अनेक नावे होती. पेम्बरटन नामक एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मतानुसार ब्रह्मदेशातील बर्मी लोक मणिपूरला ‘ काथे ’ म्हणत असत. कछाडी लोक ‘ मोगली ’ म्हणत

असत, असामी लोक ' मेकली ' म्हणत असत, आणि शान लोक ' कास्से ' म्हणत असत. परंतु मणिपूर हे नाव या भागाला केव्हापासून अस्तित्वात आले याबद्दल मात्र विद्वानामध्ये मतभिन्नता आहे. उपलब्ध प्राचीन लेखावरून या भूमीला मणिपूर हे नाव आधुनिक कालातच मिळाले आहे असे अनुमान काढले जाते.

आजचे मणिपूर हे भारतीय संघराज्यातील एक स्वतंत्र राज्य म्हणून २१ जानेवारी १९७२ पासून अस्तित्वात आलेले आहे. हा प्रदेश उंच उच्च डोंगर-रागानी वेढलेला आहे. अडीच हजार ते दहा हजार फूट उंचीच्या या डोंगररागा आहेत. या राज्याचे क्षेत्रफळ २२,३५६ वर्ग किलोमीटर आहे. आणि तेथील लोकसंख्या १०,७२,७५३ आहे. ' इम्फाळ ' नगरी ही या राज्याची राजधानी आहे.

या छोट्याशा राज्यातही बहुतेक सर्व धर्मांचे लोक राहातात. त्यांत हिंदु धर्मियाची संख्या सर्वांत अधिक म्हणजे ४,८१,११२ इतकी आहे. त्या खालोखाल ख्रिस्ती धर्मियाची १,५२,०४३ आहे. मुस्लिम ४८,५८८ आहेत, तर जैन ७७८, बौद्ध ३२५ आणि शीख ५२३ आहेत.

या राज्यात एक लाखाहून अधिक वस्ती असलेले केवळ एकच शहर असून ५० हजारावर वस्ती असलेली चार शहरे आहेत आणि १८५६ इतकी लहान गावे अथवा खेडी आहेत. इम्फाळ हेच राजधानीचे मोठे शहर असून त्याची लोकसंख्या १,००,६०५ इतकी आहे.

मणिपूर राज्यात मणिपूर नॉर्थ, मणिपूर साउथ, मणिपूर वेस्ट, मणिपूर इस्ट आणि मणिपूर सेंट्रल असे पाच जिल्हे आहेत.

पूर्वी साक्षरतेच्या दृष्टीने हा प्रदेश मागासलेलाच होता. परंतु अलीकडे शिक्षणाचा प्रसार मोठ्या वेगाने होत असून सध्या तेथील साक्षरतेचे प्रमाण ३२-८० टक्के आहे.

या प्रदेशातील लोकाचा मुख्य व्यवसाय शेती हाच असून सुमारे ८५ टक्के लोक शेतीभातीवरच अवलंबून आहेत. भात हे येथील मुख्य पीक आहे. त्याशिवाय कापूस, नीळ, हळद इत्यादी पिकेही काढली जातात. तरतऱ्हेच्या फुलझाडाची उद्यानेही मेहनतपूर्वक केली जातात. आणि फुलाची व फुलझाडाची येथून निर्यातही केली जाते.

जंगलाची विपुलता असल्यामुळे बांबू, वेत व अन्य तऱ्हेच्या लाकडापासून

विविध प्रकारच्या वस्तू तयार करण्याचा उद्योगही या प्रदेशात चालतो. तसा इकडील प्रमुख धंदा म्हणजे कताई, विणाई आणि मच्छिमार हाच आहे. रेशमाचे किडे पाळणे हाही एक मोठा उद्योग इकडे चालतो. त्याच्यापासून रेशमाचे धागे काढले जातात आणि तलम रेशमी वस्त्रे विणली जातात.

येथील घराघरातून चरख्यावर सूत कातले जाते आणि ते विणले जाते. घरातील प्रत्येक स्त्रीला विणकाम करता येते. तरुणपणापासूनच मुलींना कताई आणि विणाई या कला शिकविल्या जातात. ज्या मुलीला या कला येत नाहीत तिचे लग्न होणेच कठिण असते. अशा प्रकारे प्रत्येक घराघरातून हातमाग असल्यामुळे आणि विणाईचे काम होत असल्यामुळे स्वतंत्र असा विणकराचा वर्ग अस्तित्वातच नाही.

येथील लोकांच्या घराभोवतीच शेती असते. स्त्रिया घरात विणकाम करतात, तर पुरुष शेतीत राबतात. घराच्या अंगणात अथवा परसात भाजीपाल्याची लागवड करतात. कोबी, फुलवर, वांगी, मुळे, गाजरे इत्यादी भाज्या ते पिकवतात जवळच्या तळ्यात मत्स्यपालन केले जाते.

## साक्षी इतिहास

महाभारत कालानंतर ८ व्या शतकापर्यंतच्या मणिपूर राज्याच्या इतिहासाचा ठावठिकाणा नीटसा लागत नाही. ८ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंतच्या अवधीत या प्रदेशावर ३६ राजवटी नांदल्या असे म्हटले जाते. या प्रदेशाची हद्द नागभूमीला लागूनच असल्यामुळे या दोन्ही प्रदेशातील परस्पर संबधाचे उल्लेख इतिहासात पुष्कळ आढळतात. इ. स. ७५० च्या आसपास येथील नाओथिंग खोंग नावाच्या राजाने या प्रदेशावर वरचेवर आक्रमण करणाऱ्या नागा लोकावर स्वारी करून त्यांचा पराभव केला होता. त्यानंतर सुमारे ५८० वर्षांनी म्हणजे १३ व्या शतकाच्या आसपास चिनी सैन्याने मणिपूरवर आक्रमण केले होते. परंतु त्या वेळी येथे राज्य करीत असलेल्या संचयरितासिंह नामक राजाने या चिनी सैन्याशी मोठ्या शौर्याने लढून त्याचा पराभव केला आणि फार मोठ्या संख्येने त्याना कैदी करून इम्फाळजवळील ‘ससाकवेंग’ नावाच्या गावात त्याना बंदिवान करून ठेवले. त्याचे वंशज ‘लोई’ या संप्रदायाच्या नावाखाली अद्यापही तेथे राहतात. या चिनी लोकांनीच रेशमी वस्त्रे विणण्याची कला आणि विटाची घरे बाधण्याचे शास्त्र मणिपुरी लोकाना शिकविले असे म्हटले जाते.

पाम्हैबा नावाचा राजा १८ व्या शतकाच्या प्रारंभी मणिपूरवर राज्य करीत होता तो राजघराण्यात जन्मला होता, परंतु त्याचे बालपण मात्र एका नागा सरदाराच्या घरी गेले होते. पाम्हैबा हा शूर आणि पराक्रमी राजा होता त्याने ब्रह्मदेशाच्या राजधानीपर्यंत स्वारी करून तो मुलूख जिंकला होता. पाम्हैबा हा जसा शूर होता तसाच तो गरीबाचा कैवारीदेखील होता. गोरगरीबाविषयी त्याला मोठा कळवळा वाटे. म्हणूनच त्याला 'गरीबनिवाज' असे म्हणत असत. याच्या कारकीर्दीतच शातीदास नावाचा एक वैष्णव साधू मणिपूरमध्ये आला होता. हा मोठा महंत होता. शातीदासाच्या उपदेशाने या राजाने स्वतः वैष्णवधर्म स्वीकारला आणि आपल्या राज्यात वैष्णव-धर्माला राजधर्म म्हणून प्रतिष्ठित केले. प्रारंभीच्या काळात या वैष्णवपंथाला तेथे 'रामानंदी' असे म्हणत असत. या पंथामुळें तिकडे रामाची व हनुमानाची मंदिरे स्थापन झाली. भारतीय संस्कृतीचा प्रभाव या पंथामुळे मणिपूर प्रदेशावर पुनश्च उमटू लागला. याच महंताने पाम्हैबा राजाला असेही सांगितले होते की, तू चंद्रवंशीय क्षत्रिय असून अर्जुन हा तुमच्या वंशाचा आदिपुरुष आहे. हे ऐकून राजाला मोठा आनंद झाला आणि त्याच वेळी वैष्णव-धर्माची दीक्षा घेतली. त्यानंतर त्याचे नाव गोपालसिंह असे पडले. गोपालसिंहाने सुमारे ४० वर्षे राज्य केले या काळात त्याने आपल्या राज्याची उन्नती केली; परंतु अखेरीस गृहकलहामुळे तेथे संघर्ष उत्पन्न झाला. या राजाला दोन राण्या होत्या. पहिलीच्या मुलाचे नाव शामशाह असे होते आणि दुसरीच्या सहा मुलांपैकी मोठ्याचे नाव अजितशाह होते. शामशाह हा गादीचा वारस असताना गोपालसिंहाने धाकट्या राणीच्या हट्टामुळे अजितशाहला गादीवर बसविले. शामशाहने याला विरोध केला नाही, परंतु अजितशाहला मात्र मनातून त्याच्याविषयी शंका व भय वाटत होते. एकदा गोपालसिंह शामशाहला घेऊन काही राजकीय कामासाठी ब्रह्मदेशाला गेला होता. तिकडून हे परत येत असताना अजितशाहाला कोणी तरी सांगिले की गोपालसिंत आता शामशाहला गादीवर बसविण्याच्या तयारीत आहे. हे कळताच आधीच शंकित असलेल्या अजितशाहने रस्त्यातच त्या दोघाचा वध केला. मणिपूरमध्येही बऱ्याच सरदार-अमात्याचा त्याने वध केला. त्या नंतर मणिपूरमध्येही सत्तेसाठी सूडाचेच राजकारण सुरू झाले. अजितशाहचा एक भाऊ भरतशहा म्हणून होता, त्याने अजितशहाला गादीवरून हुसकून लावले. भरतशहाने काही वर्षे राज्य केल्यावर त्याच्या पश्चात शामशहाचा पुत्र जयसिंह हा मणिपूरच्या सिंहासनावर

बसला. दरम्यान अजितशहाने इंग्रजांच्याकडे धाव घेऊन सहाय्याची विनंती केली होती, परंतु इंग्रजानीही त्या वेळी जयसिंहालाच पाठिंबा दिला. जयसिंहाच्या पश्चात पुनश्च सत्तेसाठी कट– कारस्थाने शिजू लागली. त्यात एका पक्षाने ब्रह्मदेशाच्या सैन्याला पाचारण केले तर दुसऱ्याने इंग्रजाकडे मदत मागितली. ब्रह्मदेशाच्या राजाच्या नेतृत्वाखाली त्याच्या सैन्याने मणिपूर जिंकून घेतले. परंतु इंग्रजानी ब्रह्मदेशावर हल्ला चढविला. पुढे दोघात तह होऊन हे युद्ध थांबले. या वेळी झालेला तह ' याण्डाबो तह ' नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. याच सुमारास गंभीरसिंह नावाच्या एका मणिपूरच्या राजकुमारानेच तेथील सत्ता आपल्या हाती घेतली होती आणि त्याने वीर नरसिंह नावाच्या एका शूर आणि हुषार योद्ध्याला आपला सेनापती नेमून टाकले होते. त्याने बाहेरच्या आणि आतल्या शत्रूंपासून या भूप्रदेशाची सुटका केली आणि राज्याचा विस्तारही केला. मणिपूरमध्ये बऱ्याच काळच्या यादवीनंतर शांतता नांदू लागली होती, परंतु ती फार काळ टिकली नाही. गंभीरसिंह राजा ज्या वेळी मृत्यु पावला त्या वेळी चंद्रकिर्ती नावाचा त्याचा मुलगा केवळ एक वर्षाचाच होता. राजाच्या पश्चात त्याचा विश्वासू सेनापती नरसिंह याने त्या लहान बालकाचे आणि राज्याचे चांगल्या तऱ्हेने सरक्षण केले. परंतु राजप्रासादात सत्तेसाठी पुनश्च कट-कारस्थाने शिजू लागली. नरसिंहाचा एक भाऊ देवेन्द्र नावाचा होता. त्याने नवीनसिंह नावाच्या एका सत्तापिपासू माणसाशी संधान बांधून चंद्रकिर्तीवर संकट येऊ घातले आहे असे राणीला भासविले. त्यामुळे राणीदेखील त्याच्या कारस्थानात सहभागी झाली. परंतु नरसिंहाला याचा पत्ता लागला, तेव्हा त्याने उपाययोजना सुरू करताच भयाने राणी चंद्रकिर्तींला घेऊन कछाड भागात पळून गेली. तेव्हा नरसिंह स्वत:च मणिपूरचा राजा बनला.

एके दिवशी संध्याकाळी नरसिंह एका मंदिरात प्रार्थना करीत असता नवीनसिंहाने संधी साधून त्याच्यावर तलवारीचा वार केला. नरसिंहाने सावधपणाने आपला जीव बचावला, परंतु त्याचा उजवा हात मात्र कापला गेला. पुढे त्या दुःखातच त्याचा मृत्यू झाला. नंतर देवेंद्रसिंह मणिपूरच्या गादीवर बसला. दरम्यान चंद्रकीर्ती कछाडमधून मोठा झाल्यावर मणिपूरला परत आला. आला तोच अत्यंत हीन-दीन स्थितीत, डोंगर राने तुडवीतच आला. परंतु मणिपुरात आल्यावर तेथील लोकाना त्याने आपला परिचय करून दिल्याबरोबर लोक त्याच्याभोवती गोळा झाले. त्याना देवेन्द्रसिंहासारखा अत्याचारी राजा नकोच

होता. म्हणून त्यानी त्याच्याशी युद्ध आरंभिले. त्या युद्धात देवेंद्रसिंहाचा पराभव झाला व चंद्रकीर्ती मणिपूरचा राजा बनला. चंद्रकीर्तीने सुमारे ३५ वर्षे राज्य केले. त्यानंतर पुन्हा सत्तेसाठी संघर्ष सुरू झाले आणि इंग्रजानी त्यात आपले हात धुवून घेतले. १८९१ साली, त्या वेळी मणिपूरच्या गादीवर असलेल्या कुलचंद्र राजाला इंग्रजानी पदच्युत केले. येथून पुढे इंग्रजाची सत्ता अबाधितपणे सुरू झाली. आणि त्याच्या आधिपत्याखालीच मणिपूर हे एक मांडलिक संस्थान म्हणून अस्तित्वात आले.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतातील इतर संस्थानाप्रमाणेच मणिपूरच्या राजानेही १५ ऑक्टोबर १९४७ रोजी आपले मणिपूर सस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी मणिपूर हे 'ग' वर्गीय एक राज्य होते. त्यानंतर १९६३ मध्ये मणिपूरला केंद्रशासित प्रदेश बनविण्यात आले, आणि तेथील जनतेची इच्छाआकाक्षा लक्षात घेऊन २१ जानेवारी १९७२ रोजी मणिपूरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्यात आली. त्या दिवशी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गाधी याच्या हस्तेच या नवीन राज्याचे उद्घाटन झाले.

**लोक आणि लोकाचार :**

मणिपूर हे छोटेसे राज्य असले तरी येथे विविध वंशीय लोक राहतात. आर्य, द्रविड, मंगोल, शाग. अनार्य इत्यादी अनेक लोक येथे आले आणि वसले. प्रारंभी त्यानी आपले वेगळेपण टिकवले होते. परंतु पुढे ते सर्व एकमेकात मिसळून गेले. त्यानंतर येथील लोक आता 'मयितेयि' या नावाने ओळखले जातात. वस्तुतः निंगभुजा, अंगोम, तुवाग, खुमान, मोइराग, खाबुडाबा आणि चेंगलेइ या सात बलिष्ठ जमातींचेच मयितेयि जमातीत रूपांतर झालेले आहे. या मयितेयि जमातीला मणिपूरच्या इतिहासात विशेष स्थान आहे. मणिपूरच्या संस्कृतीवरही त्याचा ठसा आहे. हे लोक स्वतःची चीनी आणि आर्य याच्यापासून उत्पत्ती झाली असे मानतात. मयितेयि या जमातीमध्येही अनेक उपजाती आहेत. मयितेयि जमातीतील बहुतेक लोक क्षत्रिय आहेत. भारताच्या विविध प्रदेशातून वेळेनुसार जो ब्राह्मणवर्ग तिकडे गेला तो समाजातील आपले श्रेष्ठत्व साभाळून राहिला. पूर्वीच्या काळी त्याचे व क्षत्रियाचे विवाहसंबंध होत असत. मुस्लिम आणि लोई हेही समाज तेथे स्थिर झालेले आहेत. मणिपूरमध्ये कुकी वंशान्तर्गत अयिमोल नावाची एक जमात

आहे. हे लोक लोगताक नदीच्या पूर्वेकडील पहाडामध्ये राहतात. त्याच्यातही अनेक उपजाती आहेत. आणि त्या एक स्वतःला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजतात. अयिमोल कुटुंबामध्ये आई-वडील आपल्या मुलांचे पालनपोषण, शिक्षण, रक्षण जबाबदारीने पार पाडतात. प्रत्येक जमातीच्या वेगळ्या अशा चालीरीती आहेत. मणिपूरातील बहुतेक लोक खेड्यात राहून आपापली शेतीभाती करतात. त्या-खालोखाल सुताचे कापड विणणे हा उद्योग घरोघर चालतो. या उद्योगात प्रामुख्याने स्त्रिया गुंतलेल्या आहेत. मणिपूरच्या कुठल्याही बाजारात गेले असता तेथे स्त्रियांचेच राज्य चाललेले दिसते. खरेदी-विक्रीचा उद्योग बहुतेक स्त्रियाच करतात. इकडील स्त्रिया हुशार आणि उद्योगी आहेत. त्यांना समाजात बराच मानही दिला जातो. तरुण मुलींना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य इकडील समाजात आहे. त्यामुळे तरुण व तरुणी आपले विवाह स्वतःच ठरवितात. समाजात स्त्रियांची संख्या अधिक असल्यामुळे एक पुरुषाला अनेक बायका करण्याची पद्धत इकडे रूढ होती. लग्नाच्या वेळी इकडे हुंडा देण्या-घेण्याची पद्धत नाही. तसेच लग्न समारंभही साधेपणानेच पार पडतात. घटस्फोट आणि विधवा-विवाहदेखील इकडील समाजात प्रचलित आहेत.

'मोरुंग' नावाची वैशिष्ट्यपूर्ण संस्था मणिपूर भागातही गावोगावी आढळते. या मोरुंगमधून तरुणतरुणी राहतात.

पुरुमकुकी नावाच्या जमातीत वधू मिळविण्यासाठी वराला आपल्या सासरी राहून सेवा करावी लागते. अशा प्रकारे वराला वधूपित्याच्या घरी तीन वर्षे काम करावे लागते. त्यानंतर विवाह होऊ शकतो. अशा प्रकारची प्रथा मणिपूरमधील रागखोल, कुकी, अयिमोल, अवाल आणि चिरू या जमातींमध्येदेखील रूढ आहे.

येथील ग्रामीण समाजामध्ये गावाच्या भल्यासाठी झीज सोसून कष्ट करण्याची, तसेच एकमेकांच्या उपयोगी पडण्याची कर्तव्य भावना रुजलेली आहे. गावच्या पंचायतीच्या कारभारात हे लोक भाग घेतात. गावातली भांडणे आपसात मिटवतात. गावच्या जत्रा-यात्रा वर्गणी काढून पार पाडतात आपल्या गावचे रस्ते साफ करतात. गावच्या संरक्षणासाठी दक्ष असतात.

इकडील स्त्री-पुरुषांची रहाणी तशी साधीच परंतु कलापूर्ण असते. वेशभूषा आकर्षक असते. मणिपुरी स्त्रिया स्वतःच विणकाम करीत असल्यामुळे आणि त्यात त्या निपुण असल्यामुळे त्यांच्या कपड्यावर सुरेख कशिदा काढलेला असतो.

प्रत्येक स्त्री ' पानेक ' नावाची चादर राष्ट्रीय वस्त्र म्हणून वापरते. तिचा रंग गर्द निळा-तांबडा असतो. तरुण स्त्रिया उघड्या खांद्यावर अत्यंत तलम असा दुपट्टा गुंडाळतात.

मणिपूर भागातील बहुतेक लोक शाकाहारी आहेत. पुरुषांना अंगाला चंदन लावण्याची आवड आहे. बरेच लोक शैव पंथाचे असून शिवभक्त आहेत. वैष्णव पंथाला मध्यंतरीच्या काळात राजाश्रय मिळाल्यावर त्याचा बराच प्रसार झाला; परंतु तरीही इकडील शैव पंथ संपुष्टात आला नाही. विश्वाचा जनक जो परमेश्वर त्याला मणिपुरी लोक गुरू म्हणतात. या गुरूचा पुत्र पाबंग्बा हा सर्पाच्या रूपात वावरतो; तोच सर्वांचे रक्षण करतो आणि त्याच्यापासूनच मणिपुरातील राजवंश निर्माण झाला अशी लोकश्रद्धा आहे. बहुतेक मणिपूरी लोकांच्या घरात राधा-गोविंदाच्या मूर्ति असतात आणि त्याची रोज पूजाअर्चा केली जाते. त्याच-बरोबर पाथयिबी, नुंगशाबा, सानमाही, इमुंग्लाइ, इत्यादी स्थानीय देवदेवतांचे भजन-पूजनही काही लोक करतात. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाम्हैबाचा नातू भाग्यचंद्र याच्या राजवटीत बंगालमधील वैष्णवपंथीयांनी प्रेमानंद ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरमध्ये गौडीय वैष्णव पंथाचा प्रसार केला. तेव्हापासून जुना रामानंदी पंथ मागे पडला आणि गौडीय वैष्णव धर्मपंथाचे ग्रंथ व कथाकीर्तन बंगाली भाषेत असल्यामुळे त्या भाषेचाही तेथे प्रसार झालेला आहे. भाग्यचंद्र हा ललितकलांचा भोक्ता होता. त्याने साहित्य व ललितकलांना बरेच उत्तेजन दिले. त्यानेच लाइहरोबा या प्राचीन शैव प्रकृतीच्या लोकनृत्याला वैष्णव रासलीलाचे स्वरूप दिले. पहाडात वसणाऱ्या आदीमजातींची अनेक देवदैवते आहेत.

इम्फाळ आणि थोराक या इकडील दोन प्रसिद्ध नद्या आहेत. या सरितांना प्रसन्न ठेवण्यासाठी दरवर्षी मोठी जत्रा भरते.

## सण–समारंभ

इकडील समाजात जाती–जमातीनिहाय पुष्कळच सण–समारंभ आहेत. त्यामुळे मणिपूरला उत्सवभूमी असेही म्हटले जाते. चेराओबा हा नववर्षाचा सण, तसेच रथयात्रा, डोलयात्रा हे महत्त्वाचे सण मानले जातात. दुर्गापूजा, दिवाळी इत्यादी उत्सवही साजरे केले जातात. होळीचा उत्सवही येथे फार लोकप्रिय आहे. याची तयारी कित्येक दिवस आधीच सुरू होते. मंदिराची साफसफाई केली जाते. नृत्यगृहे सजविली जातात. गावागावातून मुली एकमेकींचा हात धरून रस्ता

अडवितात आणि लोकाकडून ' पैसा पिरो ' म्हणून होळीसाठी वर्गणी जमा करतात. लोकही आपापल्या शक्तीनुसार पैसे देतात. त्यातून होळीपूजा होते, रंग खेळला जातो. आणि रात्री चांदण्यात तरुण तरुणी मिळून ' थावल चोंम्बा ' नावाचे नृत्य करतात. मणिपुरी लोक होळीला ' माउशाग ' असे म्हणतात. होळीच्या दिवशी सकाळपासूनच लोक एकमेकाच्या अंगावर रंग टाकतात. इम्फाळ आणि आसपासचे लोक श्रीगोविंदजीच्या मंदिरात जमतात. पूर्वी तेथील राज-मंडपात राजाच्या मार्फत भजन आणि नृत्य होत असे. येथील वैष्णव लोक कृष्णाचे अनन्य भक्त आहेत. ते अत्यंत श्रद्धाळू आणि भावुक आहेत. गीतगोविंद गाताना भक्तिभावाने त्याचे डोळे पाझरत असतात. रात्री थावलचोंबा नृत्य चालते. पंधरा दिवस हे नृत्य सुरू असते. हे लोकनृत्य एका विशेष गीताच्या लयीवर चालते. घरांघरातून आणि गल्लीमोहल्यातून प्रत्येक गावातून हे नृत्य सुरू असते. थावल चोंबा हे नृत्य म्हणजे मणिपुरी होळीचा प्राणच आहे. मणिपूर भागात या वेळी अत्यंत लोभस असे सृष्टिसौंदर्य असते. याच सुमारास पुष्कळसे तरुण आणि तरुणी पळून जाऊन गाधर्वविवाह लावतात. इकडील प्रथेनुसार मुलाने मुलीला पळवून नेवून तीन दिवस जर दडवून ठेवले तर त्याच्या विवाहाला समाज मान्यता देतो.

## भाषा आणि साहित्य

या राज्यात बोलल्या जाणाऱ्या भाषेला मणिपुरी असेच नाव आहे. तिलाच मैतैरोल असेही म्हणतात. या भाषेची उत्पत्ती केव्हा झाली यासंबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाही, पण त्याविषयी एक दंतकथा प्रचलीत आहे

हरिचकमध्ये ( सत्ययुगात ) अतीया गुरुशिदबाने ( शिवाने ) मणिपूरच्या भूमीची निर्मिती केली आणि या भूमीलाच आपली क्रीडाभूमी बनवली.त्यानंतर त्याने सनामही आणि पारबंबा या आपल्या दोन पुत्राना मणिपुरी भाषेत शिकविले. तसेच शिवाने आपल्या शिष्याना शीवीगा ( शिवाज्ञा ) नामक धर्मग्रंथ शिकवला. प्रथम त्याने जे अक्षर शिष्याना शिकवले त्याचे नाव शिबारवर ( शिवाचे अक्षर ) असे होते. शिवाने आपल्या शिष्याना असा वर दिला की, या अक्षराचे ज्ञान झाल्या-बरोबर त्याना सर्व साहित्याची माहिती होईल. या दंतकथेनुसार हाच मणिपुरी भाषेचा व लिपीचा उत्पत्तिकाळ होय. प्राचीन काळी मणिपुरी भाषेला लिपी नव्हती. आणि या भाषेत देवदेवतांच्या प्रार्थनेव्यतिरिक्त इतर काही साहित्यही

नव्हते. पाखंबा नामक राजाच्या कारकीर्दीत मणिपूरी भाषा लिहिली जाऊ लागली. त्यानंतर या भाषेत कथा, कविता इत्यादी साहित्य लिखित स्वरूपात सुरू झाले. इ. स. ६६३ मध्ये नाओथिंकोग नावाच्या राजाच्या कारकिर्दीत अगोन पुरुंबा नावाचा एक कवी होऊन गेला. त्याने लिहिलेल्या 'चकपारोल' नावाच्या काव्यात युगनिर्मितीची कथा दिलेली आहे. याच कवीने ताम्रपटावर लिहिलेला 'शीवबूफंग-नबा लाइरिक' नावाचा एक धार्मिक ग्रंथ उपलब्ध आहे त्यानंतर १०७४ पर्यंत मणिपुरी साहित्यात महत्त्वाची अशी भर पडलेली दिसत नाही. पुढे मात्र 'खंबा थोइबी' आणि 'नुरा नहा' अशी दोन काव्ये 'भैतेनुया' म्हणजे मणिपुरी पुराण आणि राज्यकारभारविषयक काही ग्रंथ असे साहित्य मणिपुरीत निर्माण झाले. १३ व्या शतकाच्या सुमारास मणिपुरी भाषेवर आणि साहित्यावर संस्कृतचा प्रभाव पडू लागल्याचे आढळते. पुढल्या दोन तीन शतकात या प्रदेशात ब्राह्मणधर्माचा अवतार झाला आणि त्या योगाने धार्मिक वाङ्मयाची निर्मिती होऊ लागली. १४७१ मध्ये मणिपूरचा इतिहास लिहिण्याला प्रारंभ झाला 'कुमाबा' या नावाने हा इतिहास प्रसिद्ध आहे. १७३२ च्या सुमारास मणिपूरमध्ये धर्मयुद्ध झाले होते तेव्हा सिल्हेटहून शांतिदास नावाचा महंत मणिपूरात आला होता. त्या वेळी तेथे गरीबनिवाज नावाचा राजा राज्य करीत होता. या राजावर शांतिदासाच्या वैष्णवी धर्मपंथाच्या उपासनेचा बराच प्रभाव पडला होता. त्याने शांतिदासाच्या रामानंदी पंथाचा स्वतः स्वीकार केला आणि त्याला राजाश्रयही दिला. परंतु मणिपुरातील मूळ धर्मगुरूने रामानंदी पंथाला विरोध केला आणि लोकांनी त्याचा स्वीकार करू नये असे सांगितले त्यामुळे बहुसंख्य लोकांनी राजाची इच्छा धुडकावून लावली. राजा रागावला आणि राजा व प्रजा यांच्यात एक धर्मयुद्धच उभे राहिले या वेळी राजाने शांतिदासाच्या सांगण्यावरून मणिपुरी भाषेतील प्राचीन व तत्कालीन ग्रंथ जाळून टाकले. इतकेच करून राजा थांबला नाही तर त्याने यापुढे लोकांनी मणिपुरी भाषेत गाणी म्हणू नये व भजनकीर्तनही करू नये; आणि तसे केल्यास पाप लागेल, अशी राजाज्ञा काढली

याच काळात मणिपूर, मणिपुरी भाषा आणि मणिपुरी जाती यांचे माहितीपूर्ण इतिहास लिहिले गेले. अङ्गोम कवीने मणिपुरी भाषेत रामायण आणि महाभारत यांचे अनुवाद याच काळात केले. मणिपुरी काव्याचा विकासही याच काळात पुष्कळ झाला. त्या वेळची काही लोकगीते आजही लाइहरोबा नामक नृत्याच्या वेळी गायली जातात. त्यापैकीच एक गीत असे आहे—

चींग-दा शातपा इडेलले,
चिननदना केनखिबा,
कल्लकइदा कल्लकइ ।
ऐना केनगे केनदेदो,
मालेंग-बना हुमबगी,
केनबनि, हा केनबनिदे ।
मालग-ब ऐसु कैदौदे,
लैरांग-ना लैखोक लोईबगी,
केनबनि हा केलबनिदे ।

या गीताचा अर्थ असा की, हे डोंगरात उगवलेल्या फुला, तोडून तुझा उपयोग केल्याशिवाय तू आपण होऊन गळून पडलास आणि तुझा नाश झाला हे पाहून मला दुःख होत आहे. वाऱ्याच्या जोराने माझ्या पाकळ्या गळून पडल्या. फुलाचे बोलणे ऐकून वारा म्हणतो की, शिळे झाल्यामुळे फूल आपोआप गळून पडले.

१८ व्या आणि १९ व्या शतकात मणिपुरी साहित्यात पुष्कळच परिवर्तन झाले. संस्कृत आणि बंगाली या भाषांच्या व्यतिरिक्त हिंदी आणि ब्रज भाषातील शब्दही मणिपुरी भाषेत समाविष्ट झाले. या काळात होऊन गेलेल्या राजानाही बंगाली भाषेबद्दल बरेच आकर्षण निर्माण झाले होते. आणि त्याच्या प्रेरणेने मणिपुरी साहित्य बंगाली लिपीत लिहिले जाऊ लागले होते. परंतु २० व्या शतकाच्या प्रारंभी मणिपुरी अस्मितेचा पुनश्च उदय झाला आणि मणिपुरी साहित्याचा विकास होऊ लागला. या काळात चुडाचादसिंह या नावाचा राजा मणिपूर संस्थानात होता. तो मणिपुरी भाषेचा मोठा अभिमानी होता. त्याच्या प्रेरणेने तत्कालीन साहित्यिकानी मणिपुरी लिहीण्यास सुरवात केली.

मणिपुरी साहित्यामध्ये बंगाली भाषेला तिचे असे एक स्थान मध्यंतरीच्या काळात प्राप्त झाले होते ब्रिटिशाच्या काळातील सरकारी कागदपत्रे बंगाली भाषेतच असत. काही मणिपुरी कवींनी बंगाली गीते आणि भजने रचली. आजही कृत्तिवास कवीने लिहिलेले बंगाली रामायण मोठ्या श्रद्धेने वाचले जाते. तसेच काशीरामदास नामक लेखकाने रचलेले बंगाली महाभारत, चैतन्यचरितामृत आणि इतरही धार्मिक बंगाली ग्रंथ मणिपुरी लोक भक्तिभावपूर्वक वाचत असतात. मणिपूर-

मधील धार्मिक अथवा सामाजिक उत्सवात बंगाली भजने तर सरसहा गायली जातात. इतकेच नव्हे तर १०२४ पर्यंत मणिपुरातील शिक्षणाचे माध्यम बंगाली होते. त्या काळी मणिपुरी कलावंत बहुतेक बंगाली नाटकेच करीत असत. परंतु बंगाली भाषेचा एवढा वापर असूनही मणिपुरी भाषा तेवढी उपेक्षित राहिली नाही.

अलीकडच्या काळात साहित्याच्या सर्व दालनातच मणिपुरी भाषेने प्रगती केलेली आहे. डॉ. कमलसिंह, हिजाम, अंगहल, रूबाई, राजनपाय, छाओबा, अंराबम् डोरेन्द्रसिंह आदी अर्वाचीन मणिपुरीतील अग्रेसर कवी आहेत. अंगहल कवीने मणिपुरीतील लोकसाहित्य प्रकाशात आणले. त्यातील आख्यायिकाच्या आधारावर त्यानी 'खाम्बा-थोइबी' नावाचे महाकाव्य आठ खंडात रचले आहे. 'केशवध' नावाचे महाकाव्य डोरेन्द्राजितसिंह नावाच्या कवीने रचले आहे. ही दोन्ही महाकाव्ये विद्वत्मान्य असून मणिपुरी साहित्यात या दोघाही कवीश्रेष्ठाना फार श्रेष्ठ मानले जाते.

मणिपुरी रंगभूमीवर सुरुवातीच्या काळात बंगाली नाटकाचेच प्रयोग होत असत. परंतु १९१४ मध्ये 'अरजुंगी मैथिबा' हे पहिले मणिपुरी भाषेतील नाटक रंगभूमीवर आले, परंतु तेही एका बंगाली नाटकावरूनच अनुवादित केलेले होते. त्यापुढील १०–१२ वर्षे अशा प्रकारचीच नाटके रंगभूमीवर आली. त्यानंतर मात्र एल्. एम्. श्रांग्राहल यानी स्वतंत्ररीत्या मणिपुरी भाषेत लिहिलेले 'नरसिंह' हे नाटक रंगभूमीवर आले हेच मणिपुरीतील पहिले नाटक. कमलसिंह यानीही देवयानी नावाचे नाटक लिहिले होते. बोरभानीसिंह, ललितसिंह ते तरुण नाटककार मणिपुरात प्रसिद्ध आहेत.

मणिपुरी भाषेतील कादंबरी वाङ्मयदेखील विकासशील आहे, डॉ. कमलसिंह यानी लिहिलेली 'माधवी' नावाची कादबरी मणिपुरीतील पहिली कादंबरी मानली जाते. ती बरीच लोकप्रियही आहे ख्वाइराकपम चाउबासिंह आणि राजकुमार शीलजीतसिंह हे मणिपुरीतील आजचे आघाडीचे कादंबरीकार आहेत. रजनीकातसिंह, शीलजीतसिंह, आणि एलाग बम आदि साहित्यिकानी मणिपुरीतील कथावाङ्मय समृद्ध केले आहे. अलीकडे मणिपुरी भाषेत व्याकरण ग्रंथ आणि शब्दकोशही निर्माण झाले आहेत. तसेच 'कपालकुंडला', 'अभिज्ञान शाकुंतल', 'मेघनाथ वध' इत्यादी अनुवादित काव्येही प्रसिद्ध झालेली आहेत.

अशा प्रकारे सर्वांगानी मणिपुरी साहित्य समृद्ध होत असून मणिपुरीतील

नियतकालिकेही याला हातभार लावीत आहेत. ‘ झासी ’, प्रजातंत्र ’, ‘ अनौबा समाज ’ इत्यादी दैनिक वृत्तपत्रे मणिपुरी भाषेत प्रसिद्ध होत असतात.

**कलाप्रियता**

मणिपुरी लोक जन्मजातच रसिक आहेत. त्यांच्या भूमीला जसे निसर्ग-लावण्य लाभलेले आहे, तसेच त्याना सौंदर्यवेधी व रसिक मनही लाभलेले आहे. मणिपूर म्हटल्याबरोबर मणिपुरी नृत्याची चटकन् आठवण होते. मणिपुरी नृत्याने भारतीयाना मोहिनी घातलेली आहेच. पण मणिपुरी लोकांच्या जीवनातच त्याला अग्रस्थान आहे. फार प्राचीन काळापासूनच या भूमीत नृत्याची जोपासना होत आली आहे. विविध जाती जमातींमध्ये विविधप्रकारची नृत्ये प्रचलित आहेत. मेइथेई जमातीत ‘ पाटन जागोई ’ नावाचे नृत्य वर्षारंभाच्या सणाला करतात. या जमातीतील लोकांची अशी श्रद्धा आहे की सात लेनुराम्नी म्हणजे देवींनी आणि नऊ लेपखंगानी म्हणजे देवानी ही पृथ्वी निर्माण केली आहे आणि या पृथ्वीनिर्मितीच्या आनंदाप्रीत्यर्थ हे नृत्य ते करतात. या नृत्यात प्रामुख्याने पेइबा म्हणजे पुजारी आणि पेईबी म्हणजे पुजारीण भाग घेतात.

याशिवाय टाळ्या वाजवून करावयाचे ‘ खवग ’ तसेच गीताच्या साथी-बरोबर नाचावयाचे ‘ इषरिचोलय ’ आणि जत्रेच्यावेळी तरुणतरुणींनी करावयाचे ‘ औग्रिहैंगल ’ ही नृत्ये लोकजीवनात सर्वत्र आढळतात. परंतु ‘ लाइहरोबा ’ हे नृत्य या सर्वांत प्राचीन असून लोकप्रिय आहे. हे नृत्य स्त्रिया व पुरुष मिळून करतात लाइहरोबा याचा अर्थ आहे देवाचा आनंदोल्हास. या नृत्याच्या उत्पत्ती-विषयी एक आख्यायिका इकडे प्रचलित आहे :

दिव्यलोकी एकदा गोपींसह श्रीकृष्ण रासक्रिडा करीत होते. ते नृत्य पाहाण्याची शिवाला इच्छा झाली आणि त्याने श्रीकृष्णाला त्या विषयी विचारले. श्रीकृष्णाने सांगितले, तुला हे नृत्य पहाता येणार नाही. परंतु तू पाठ करून उभा रहा आणि या नृत्यातले ताल, लय आणि पदाघात तेवढे ऐक शिवाने त्याप्रमाणे केले परंतु नृत्य ऐन रंगात आलेले असताना त्याचे भान सुटले आणि त्याने नकळत नृत्याकडे मुख वळवले. त्याबरोबर रासक्रिडा बंद पडली. परंतु शिवाला त्यातला ताल, लय आणि संगीतही गवसले होते. त्या आधारावर त्याने एका नव्या नृत्याची निर्मिती करावयाचे ठरविले. पार्वतीसह हे नृत्य करण्यासाठी कैलासावरून तो योग्य अशा भूमीच्या शोधात मणिपूरच्या पर्वत श्रेणीतल्या निसर्गसौंदर्य भागात आला.

तेथेच त्याने पहाड त्रिशुळाने फोडून ही भूमी बनवली आणि पार्वतीसह त्याने येथे



लाइहरोबा नृत्य

ते नृत्य केले. पुढे हे नृत्य माणसांनी आत्मसात केले आणि त्याला ' लाइहरोबा ' हे नाव दिले. शेतीमधील धान्यदेवतेला प्रसन्न करण्यासाठी हे नृत्य करतात. शेतात पेरणीच्यापूर्वी एक महिना लाइहरोबाचा नृत्योत्सव चालतो. गावातील मंदिरापुढे तरुणतरुणी एकत्र जमतात, प्रत्येक तरुण नृत्यासाठी आपली जोडीदारीण निवडतो. मग ती दोघे देवाला फुले, फळे अर्पण करून नृत्य करतात. या नृत्यातही बारा प्रकार आहेत. देवाने हे विश्व कसे निर्माण केले आणि ते कोणत्या तत्त्वांनी साकारलेले आहे ते या नृत्यातून दाखवले जाते. नृत्याची लय वाढत गेली म्हणजे त्यात खंबा आणि थोइबी यांचा प्रवेश होतो. हे इकडील प्राचीन प्रेमीयुगल आहे. खंबा हा गरीब पण शूर तरुण होता. थोइबी ही राजकन्या होती. त्या दोघांचे प्रेम जुळले पण अनेक विघ्ने पार केल्यानंतरच देवाच्या आशीर्वादाने त्यांचे मीलन झाले अशी कथा आहे. या नृत्याच्या वेळी मोठा ढोल, बासरी, प्रचंड घंटा, मंजिर, व पेना हे शिकाऱ्यासारखे असलेले तंतुवाद्य यांची साथ असते.

नृत्यात भाग घेणाऱ्या तरुणतरुणींची व स्त्रीपुरुषांची वेशभूषा आकर्षक असते.

वैष्णवपंथाचा प्रसार झाल्यावर त्याचा प्रभाव इकडील नृत्यावरही पडल्याशिवाय राहिला नाही. ' नामकीर्तन ' आणि ' रास ' अशी दोन नृत्ये त्यातून विकास पावली. नामकीर्तन हे पुरुष नर्तक करतात. धार्मिक सणासभारंभाच्या वेळी नामकीर्तन नृत्य होते. रासनृत्यामध्ये राधा आणि कृष्ण याच्या लीलांना प्राधान्य आहे. भाग्यचंद्रराजाला हे नृत्य स्वप्नात दिसले अशी आख्यायिका आहे हा राजा नृत्यसंगीताचा भोक्ता होता. स्वप्नात दिसलेल्या नृत्यानुसार त्याने आपल्या राज्यातील नृत्यविशारदाना आणि अन्य कलावंतांना बोलावले व आपण पाहिलेले नृत्य वर्णन केले. त्या वर्णनानुसार कलावंतानी नृत्याची वेशभूषा व अलंकार तयार केले. नृत्यविशारदानी राजाशी चर्चा करून एका नृत्यपद्धतीची निर्मीती केली. हीच मणिपुरी नृत्यपद्धती होय. भाग्यचंद्र राजाने मणिपूरमध्ये गोविंदजींचे मंदिर बाधले आणि त्याच्या महाभिषेकप्रसंग्री



नामकीर्तन नृत्य

रासलीला नृत्याचे आयोजन केले होते. त्यावेळी राजकुमारी सिजार्लैरोइबी हिने राधेची भूमिका केली होती. तिच्यातील नृत्यनैपुण्यामुळे तिला रासेश्वरी असे म्हणण्यात येऊ लागले. रासनृत्य हे सात-आठ तास चालते. त्यात अधुनमधून संवाद असतात पण नृत्यालाच प्राधान्य असते. रासनर्तकीची वेशभूषा भडक पण आकर्षक असते. रासलीलेचा प्रारंभ कीर्तनाने होतो. गीतगोविंदातल्या अष्टपद्या आणि गोविंदलीलामृताचा काही भाग प्रथम गायला जातो. मग सूत्रधार रासलीलेचा उपक्रम करतो. नंतर कृष्णाचा प्रवेश होतो. थोडावेळ त्याचे नृत्य होते, नंतर

पार्श्वगीत सुरू होते. त्यावरून राधेचा प्रवेश सूचीत केला जातो. तिच्यामागून वृन्दा नावाची तिची सखी प्रवेश करते ती राधा आणि कृष्ण याची भेट घडवून आणते. त्याबरोबरच बऱ्याच अशा गोपी प्रवेश करतात आणि हळूहळू नृत्य गतीमान होते.



मणिपुरी रासनर्तकी

मणिपुरी नृत्य पाहून कवीश्रेष्ठ रवीन्द्रनाथ टागोरही प्रभावित झाले होते. त्यानी आपल्या काही नृत्यनाटिकामधून या नृत्याची योजना केली आहे. शाती-निकेतनात मणिपुरी शैलीला नृत्यशिक्षणाचे माध्यम बनवून टाकले, अर्थात रवीन्द्रनाथानी या नृत्याला स्वत:च्या प्रतिभेने नाविन्य आणि आशय दिला.

मणिपुरी नृत्य आज सर्वत्र लोकप्रिय ठरले असून अनेक नर्तक आणि नर्तिका मणिपुरी नृत्याबद्दल प्रसिद्ध आहेत.

इम्फाळ ही मणिपूर राज्याची राजधानी आहे. चोहोबाजूंनी उंच उच डोंगरानी वेढलेले हे शहर समुद्रसपाटीपासून ४६२ फूटावर वसलेले आहे. सारे

शहर गर्द झाडींनी आच्छादलेले आहे. एक पुराणा राजप्रासाद शहरात आहे. त्याचप्रमाणे एक प्रचंड जुना किल्लाही येथे पहावयास मिळतो. त्यातील दरबारगृह प्रचंड असून आता जीर्णावस्थेस पोहोचले आहे. असे सांगतात की येथे पूर्वी पाषाणाचे दोन ' नंगसा ' ठेवलेले होते नंगसा म्हणजे ड्रॅगन्. आणि दरबार-गृहाला म्हणतात ' कंगला '. या नंगसाच्या पुढेच गुन्हेगाराचा वध करण्यात येत असे. या किल्ल्याच्या मागच्या बाजूने मणिपूर नावाची नदी वहाते.

राजपुरीच्या जवळच गोविंदजींचे मंदिर आणि नाट्यमंदिर आहे. दुर्गा-पूजेच्यावेळी सारे शहर नव्या उल्हासाने गजबजून जाते.

दुसऱ्या महायुद्धाची काही चिन्हे मणिपूरमध्ये दृष्टीस पडतात. मणिपुरात बरीचशी सरोवरे आहेत ती सगळीच सृष्टीसौंदर्याने नटलेली आहेत. परंतु त्यातही ' लोकतक ' नावाचे सरोवर अतीव सुंदर आहे, तसेच ते विशालही आहे. वर्षाऋतूत १०० ते १२० चौ. मैल क्षेत्रफळात याचे पाणी पसरते. बिनेशपूर येथे प्राचीन अवशेष पहावयास मिळतात.

दळणवळणाच्या दृष्टीने पूर्वी मणिपूरमधील रस्ते बरेच कच्चे, दुर्गम आणि कठीण होते. अलिकडे नवीन रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. शेती, हातमाग, मच्छीमारी इ. व्यवसायातील प्रगतीसाठी शासनातर्फे प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली असून मदत करण्यात येत आहे. नवीन जमिनही लागवडीखाली आणली जात आहे आणि अन्नधान्याबरोबरच काजू, अक्रोड इत्यादींची पिके घेण्याचीही योजना कार्यान्वित झालेली आहे. वीज पुरवण्याच्या बाबतीतही मणिपूरराज्य मागासलेल्या अवस्थेतच होते. अलिकडेच ५१०१ किलो वॅट वीज निर्मिती होईल असा ' लोकटाक हाइडेल इलेक्ट्रीक प्रॉजेक्ट ' केंद्रसरकारने हाती घेतलेला आहे. आजवर मागासलेल्या मणिपूरला विकासाच्या मार्गावर आणण्याचे प्रयत्न सर्व-दृष्टींनी सुरू आहेत.

♠ ♠

# सीमान्त राज्य त्रिपुरा

प्राचीन काली ' किरात देश ' म्हणून प्रसिद्ध असलेली भूमी आज ' त्रिपुरा ' म्हणून ओळखली जाते. त्रिपुरा हे आसाम राज्याच्या दक्षिण-पश्चिमेला आहे. सृष्टी-सौंदर्याने सुशोभित अशा पहाडाच्या आणि खोऱ्याच्या प्रदेशात त्रिपुरा आहे. हा सर्व प्रदेश आपल्याकडील एखाद्या जिल्ह्याएवढाच भरेल. याचे क्षेत्रफळ १०,४७४ चौ. किलोमीटर आहे. परंतु हा छोटासा प्रदेश देखील देशाच्या सीमेवर असल्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्रिपुराच्या तिन्ही बाजूंना बांगला देश आहे, आणि केवळ उत्तर-पूर्व भागाकडून आसामच्या कछाड जिल्ह्याशी याचा संबंध येतो. या मार्गानेच त्रिपुराचा भारतीय संघराज्याशी संपर्क जोडता येतो.

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी त्रिपुरा हे एक संस्थान होते. भारतात त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या सर्व संस्थानात त्रिपुरा हे सर्वांत जुने संस्थान मानण्यात येत असे.

तशी त्रिपुराची ही भूमी फारच प्राचीन असून महाभारतातही हिचा उल्लेख आढळतो. महाभारतातील चंद्रवंशातील ख्यातनाम राजा ययाती ह्याला द्रुह्य नावाचा एक पुत्र होता. येथील पूर्वीचे शासक स्वतःला या द्रुह्याचे वंशज मानतात. द्रुह्य राजाला बभ्रू नावाचा पुत्र होता आणि या बभ्रूलाच कपिलमुनींने महाराजा अशी पदवी दिलेली होती. पुढे याच वंशात पाचव्या पिढीत प्रसेन नावाचा राजा झाला. हा प्रसेन राजा आणि अयोध्येतील दशरथ हे समकालीन मानले जातात. याच वंशात पुढे दैत्य नावाचा राजा झाला. या दैत्य राजाने कौरवपांडवाचे गुरू द्रोणाचार्य याचा मुलगा अश्वत्थामा याच्यापासून धनुर्विद्येचे शिक्षण घेतले होते. पुढे याच वंशात त्रिपूर नावाचा राजा झाला आणि त्याच्या नावावरूनच किरात देशाला त्रिपुरा असे म्हटले जाऊ लागले.

**साक्षी इतिहास**

किरात ही पहाडामध्ये राहाणारी प्राचीन जमात आहे. याची वस्ती हिमा-

ल्यात होती. पश्चिमेकडे चंबा नदीपासून पूर्वेकडील नागभूमीपर्यंत किराताची जमात आजही आढळते. प्राचीनकाळी इंद्रप्रस्थाच्या पूर्व, पश्चिम आणि उत्तर भागात तीन किरात देश होते असा उल्लेख आहे. त्यातील पूर्व किरातात त्रिपुरी म्हणजे आजचे टिपरा हे समाविष्ट होते. किरात लोक भारताच्या पूर्वेस रहात असून असा उल्लेख विष्णुपुराणात आढळतो. आर्यावर्ताच्या ईशान्येस किराताचा देश होता असा उल्लेख बृहत्संहितेत आढळतो, तर उत्तरापथाच्या उत्तरेस किराताची वस्ती होती असे रामायण-महाभारतात म्हटले आहे. पहाडाच्या गुहांमधून रहाणारे किरात ताबुस गोरे आणि सुंदर होते.

ज्या त्रिपुर राजावरून या प्रदेशाला ' त्रिपुरा ' असे नाव पडले त्या त्रिपुर राजाचा पुत्र त्रिलोचन हा युधिष्ठिराने केलेल्या राजसूय यज्ञाच्या प्रसंगी उपस्थित होता. अगरतळा या शहरापासून ५–६ मैलावर असलेल्या चतुर्दश देवताच्या मंदिराची स्थापना याच त्रिलोचन राजाने केली होती, असे सांगतात. ही मंदिरे आजही जीर्णावस्थेत उभी आहेत.


शिव, उमा, विष्णु, लक्ष्मी, सरस्वती, कार्तिकेय, गणपती, चंद्र, ब्रह्म, वरुण, गंगा, अग्नि, काम आणि हिमाद्री अशा या चतुर्दश देवता या मंदिरातून आहेत. या देवतांच्या मूर्ति अष्टधातुंच्या बनविलेल्या आहेत.

प्राचीन काळात या प्रदेशाचा उल्लेख जसा महाभारतात आढळतो, तसाच ऐतिहासिक काळात सर्वात प्रथम सम्राट अशोकाच्या स्तंभावरील शीलालेखात आढळतो. या प्रदेशाला त्या लेखात " सीमान्तराज्य ' या नावाने संबोधिलेले आहे. भारतात आलेला सुप्रसिद्ध चिनी यात्रिक ह्यु-एन्-त्संग यानेही आपल्या प्रवासवर्णनात या प्रदेशाचा उल्लेख केलेला आहे. त्याने या प्रदेशाचे नाव ' यानो-लेन-किया' असे सांगितलेले आहे. त्याचे संस्कृत नाव ' कामलंका ' असे आहे. बांगला देशातील आजचे कोमिला शहर हे याच कामलंका नावावरून आले असण्याची शक्यता आहे. ब्रह्मदेशाच्या इतिहासात देखील अशा प्रकारचे वर्णन आढळते. त्यावरून असे अनुमान काढता येते की पूर्वीच्या काळी त्रिपुरा हे एक फार मोठे राज्य असावे.

मोगल काळात मोगलांनीही या प्रदेशावर अनेक वेळा आक्रमणे केली होती. परंतु १७ व्या शतकापर्यंत त्यांना हा प्रदेश जिंकून घेता आला नाही. बंगालमधील म्हणजे तत्कालीन गौडप्रदेशातील एका मुसलमान शासकाने त्रिपुरातील राजकुमार रत्न फा याच्यापुढे शरणागती दिली होती. ' फा ' ही तत्कालीन त्रिपुरातील राजाची एक कौटुंबिक पदवी होती. त्यानंतरच्या काळात मुसलमानांनी अनेक वेळा या

प्रदेशावर हल्ले केले होते.

१७६५ साली या प्रदेशात इंग्रजाचा शिरकाव झाला. ब्रिटीश आमदानीत १८ जानेवारी १९१९ रोजी त्यावेळी त्रिपुरावर राज्य करीत असलेल्या वीरेन्द्र किशोर देव बर्मन बहादुर याला 'महाराजा' हा किताब मिळाला. प्रारंभी हे संस्थान भारत सरकारच्या नियंत्रणाखाली होते. त्यानंतर १ डिसेंबर १९३६ पासून हे ईस्टर्न स्टेट एजन्सीमध्ये दाखल करण्यात आले.



रिआग नृत्य–वादक

या मागासलेल्या प्रदेशात काही सुधारणा घडवून आणण्याची सुरुवात वीरचंद्र माणिक्य नावाच्या राजाने केली होती त्याने आपल्या राज्यव्यवस्थेलाच आधुनिक स्वरूप दिले. १८७९ मध्ये त्याने आपल्या राज्यात दासप्रथा बंद केली आणि १८८८ मध्ये स्त्रियांनासती जाण्यास बंदी केली.

वीरचद्र माणिक्य राजाचे आणि कविश्रेष्ठ रवीन्द्रनाथ टागोराचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबध होते. राजाची भानुमती नावाची राणी १८८३ मध्ये मृत्यू पावली आणि त्याच वेळी रवीन्द्रनाथाची 'भग्नहृदय' ही काव्यरचना प्रसिद्ध झाली. ती वाचून राजा फारच प्रभावित झाला होता.

त्रिपुरामधील अखेरचा राजा वीरविक्रम किशोर माणिक्य होता. हा केवळ १४ वर्षांचा असताना १९३२ साली सत्तेवर आला. हा राजा शासक म्हणून लोकप्रिय होताच, पण एक बहुगुणी रसिक व्यक्ती म्हणूनही प्रसिद्ध होता. तो

दूरदर्शी होता. यानेच आगरतळा शहरापासून ६ मैलावर विमानतळ बांधला होता. भारताच्या फाळणीनंतर या विमानतळाचा फार मोठा उपयोग करता आला; कारण पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर आगरतळा ते कलकत्ता असा विमान-मार्गानेच भारताशी संबंध ठेवणे शक्य झाले होते.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १५ ऑक्टोबर १९५० रोजी त्रिपुरा संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. त्या वेळी तेथील महाराजा माणिक्य-किरीट विक्रम किशोरदेव बर्मन बहादुर हा होता. हा राजा म्हणजे ह्या राजाची १७९ वी पिढी होय.

त्रिपुरा संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्यानंतर त्याला 'ग' वर्गीय राज्य म्हणून मान्यता मिळाली. त्यानंतर १९५६ साली हा केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर करण्यात आला. परंतु आर्थिक विकासाच्या दृष्टीने व सीमे-



रिआंग नृत्य

वरील एक महत्त्वपूर्ण प्रदेश म्हणून आपल्या प्रदेशाला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावी अशी तेथील लोकांची मागणी होती. त्यानुसार २१ जानेवारी १९७२ रोजी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते त्रिपुरा हे भारतीय संघ-राज्यातील २१ वे राज्य म्हणून उद्घाटित करण्यात आले.

या प्रदेशातील आदिम जमातीतील लोकाना 'तिपेरा' जमातीचे लोक म्हणून ओळखले जाते. तिपेरा शब्दही त्रिपुराचाच अपभ्रंश आहे. तिबेटी आणि बर्मी या जातींचे हे लोक असून शान जमातीशी मिळते-जुळते आहेत. काही तज्ज्ञाचे असे मत आहे की हे मूळचे उत्तर सीमेकडील रोहित आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या भू-भागात वसती करीत होते पुढे भटकत भटकत ते ह्या सुंदर प्रदेशात आले आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा डोंगराळ प्रदेश त्याना योग्य वाटला म्हणून ते येथेच स्थायिक झाले. कामरूप आसाममधून हे लोक येथे येऊन वसले असावेत असेही काहींचे मत आहे. अशी एक दंतकथा आहे की, कोण्या एका कामरूपाच्या राजाला दोन पुत्र होते. त्यातील मोठ्याला कछाड प्रदेशातील राज्य मिळाले व धाकट्याला त्रिपुराचे राज्य मिळाले.

**प्रदेश आणि लोकजीवन**

या प्रदेशात जवळजवळ १९–२० जमातींचे लोक राहतात. या सर्व आदिवासी जमाती असून त्यात त्रिपुरि, चकमा, रियाग, हालम, जमतिया, मेग, नो आटिया, गारो, लुशाई आदी जाती प्रमुख आहेत. यातील बहुतेक लोक जंगला-डोंगरात रहातात.

त्रिपुराची राजधानी आगरतळा इथे असून या प्रदेशाची लोकसंख्या १५ लाख ५७ हजार आहे. भारताच्या फाळणीनंतर पुष्कळसे बंगाली हिंदू येथे येऊन राहिले. त्यामुळे या लहानशा प्रदेशात निर्वासिताची बरीच गर्दी झाली. त्रिपुरा हाच एक असा प्रदेश असावा की जेथे आज मूळच्या लोकापेक्षा निर्वासिताची संख्या अधिक आहे. या बाहेरून आलेल्या लोकामुळे या प्रदेशाचे स्वरूप एकदम पालटून गेले.

त्रिपुरा राज्यात नॉर्थ त्रिपुरा, साउथ त्रिपुरा आणि वेस्ट त्रिपुरा असे तीन जिल्हे असून राज्यकारभाराच्या दृष्टीने सदर, खोवाई, कैलाशहर, धर्मनगर सोनामुरा उदयपूर, वेलोनिया, कमलपूर, सावरूम, आणि अमरपूर असे दहा सब-डिव्हिजनस् तयार केलेले आहेत. येथे राहणाऱ्या लोकात ८,६७,९९८ हिंदू, २,३०,००२ मुस्लीम, ३३,७१६ बौद्ध आणि १०,०३९ ख्रिश्चन अशा विविध

धर्मांचे लोक आहेत. येथील साक्षरतेचे प्रमाण ३०·८७ इतके आहे. ५० हजारांवर वस्ती असलेले एकच शहर या राज्यात असून ४९३२ लहान लहान गावे आहेत.

त्रिपुरामधील बहुसंख्य लोक हिंदुधर्माचे असून ते वैष्णवपंथी आहेत. बंगालमधील चैतन्य संप्रदायाचा प्रभाव या लोकांवर पडलेला आहे. आदिवासी लोकांमध्ये त्यांच्या आपल्या पूजापद्धती रूढ आहेत. हे लोक धष्टपुष्ट आणि परिश्रम करणारे आहेत. हे लोक बांबूच्या झोपड्या बांधून राहतात. काहीजण कच्चा मातीची छोटीशी घरेही बांधतात. शेती हाच मुख्य व्यवसाय असून भात, मासे आणि डुकराचे मांस हे पदार्थ त्यांच्या जेवणात प्रामुख्याने असतात. भाताशिवाय ताग, जूट, कापूस, तीळ, भुइमूग आणि चहा यांचेही येथे उत्पादन होते. लिची, संत्री, काजू इ. फळेही येथे होतात. जंगलाच्या विपुलतेमुळे लाकूड, बांबू, वेत यांपासून विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचा उद्योग येथे चालतो. हातमाग आणि रेशीम तयार करण्याचा उद्योगही बऱ्याच ठिकाणी चालतो. धातूंच्या व लाकडाच्या वस्तूंवरील नक्षीकाम व कपड्यावरील सुंदर डिझाइन्स यासाठी त्रिपुरा प्रसिद्ध आहे.



विष्णू-प्रतिमा

भिन्नभिन्न जमातींतील लोक त्यांच्या त्यांच्या बोली बोलतात. परंतु या राज्याची बंगाली हीच राज्यभाषा आहे. निरनिराळ्या जमातींच्या बोलीभाषेत लोककथा, लोकगीते इत्यादी बरेच लोकवाङ्मय आहे आणि पिढ्यान् पिढ्या लोकांच्या स्मरणातून ते आलेले आहे.

## विकासोन्मुख त्रिपुरा

त्रिपुरा प्रदेशात चहाचे मळे बरेच असून चहा उत्पादनाचा उद्योग बराच चालतो. याशिवाय ज्यूटचे कारखाने, पोलाद, गॅस फॅक्टरी, सोडिअम सल्फेट इत्यादी प्रकारचे कारखाने काढण्याच्या योजना शासनामार्फत कार्यान्वित झालेल्या आहेत. वीज आणि इंधन यांची बरीच कमतरता असल्यामुळे आजवर या प्रदेशाचा म्हणावा तसा औद्योगिक विकास झाला नाही. सडका आणि इतर दळणवळणाची साधनेही या भागात फारशी नव्हती. परंतु नव्या विकास योजनामध्ये ह्या उणीवा दूर करून औद्योगिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या प्रदेशात खनिज संपत्ती विपुल आहे येथे बऱ्याच मोठ्या प्रमाणात तेल मिळण्याची शक्यता आहे, असे तज्ज्ञाचे मत आहे, आणि त्या दृष्टीने 'ऑइल अँन्ड नॅचरल ग्रॅस कमिशनच्या मार्फत तेलाच्या विहिरी खोदण्याचे काम चालू झालेले आहे. २०० कि. मी. लांबीचा आसाम-आगरताळा नावाचा रस्ता अलिकडेच करण्यात आला आहे. हा रस्ता आगरताळा ते आसाममधील चारीबारी शहरापर्यंत जातो. या रस्त्यामुळे वाहतुकीची बरीचशी सोय झालेली आहे. धर्मपूर ते आसाममधील कलकाळी घाट असा एक रेल्वेमार्गही झालेला आहे. नद्यांच्या पात्रातून, नावामधून ही दळणवळण चालते.

## कलाप्रिय त्रिपुरा

त्रिपुरा राज्यातील लोक जसे मेहनती व कष्टाळू आहेत, तसेच ते रसिक आणि कलाप्रियदेखील आहेत. त्रिपुराच्या समाजजीवनातही सण-समारंभ आणि नृत्य-संगीत याना स्थान आहे. आगरतळापासून सहा-सात तासाच्या रस्त्यावर एक पहाड आहे. तेथे डोंगरात अनेक देवदेवताच्या मूर्ती खोदलेल्या आहेत त्यातील काही बौद्धकालीन आहेत असे सागतात. या स्थळाला 'उनाकुटी तीर्थ' असे म्हणतात. 'अशोकाष्टमी' या नावाने एक मोठी जत्रा दरवर्षी येथे भरते. 'रुद्रसागर' नावाचे एक सुदर सरोवर या राज्यात आहे. या सरोवराच्या मधोमध एक महाल बाधलेला आहे हे फारच निसर्ग रमणीय असे ठिकाण आहे.

'त्रिपुर सुंदरी' नावाचे प्रसिद्ध मंदिर उदयपूर येथे एका पहाडावर आहे.

५१ पीठस्थानापैकी हे एक प्रसिद्ध स्थळ आहे. सुमारे ४५० वर्षांपूर्वी धन्यमाणिक्य नावाच्या राजाने हे मंदिर बांधले. दिवाळीच्यावेळी येथे मोठी जत्रा भरते. उदयपुरात आणखीही वरीच मंदिरे असून याला मंदिराचे नगर असेच म्हणतात. या प्रदेशातील 'गुमति' नावाची नदी जेथे उगम पावते त्या स्थानाला 'तीर्थमुख' असे म्हणतात. हे निसर्ग रमणीय असे ठिकाण आहे. उत्तरायण संक्रातिच्या वेळी हजारो भाविक लोक येथे स्नानासाठी येतात.



विष्णुमूर्ती—उदयपूर

ग्रामीण समाजात सणसमारंभाच्या-वेळी नृत्यसंगीताला बहर येतो. 'जरिगान नृत्य' हे येथील किसानाचे प्राचीन असे नृत्य आहे. त्या नृत्याच्या वेळी पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक अशा विविध विषयावरची गाणी गातात. ही गाणी बहुधा वृद्धमंडळी गातात व तरुणमंडळी नृत्यात भाग घेतात. त्यांच्या हातात रंगीत रुमाल व गळ्यात फळांच्या माळा असतात. हे नृत्य फेर धरून करतात. सुरुवातीला संथगतीत असलेल्या नृत्याची लय हळूहळू वाढत जाते.

रियाग जमातीचे नृत्य 'रियाग' नावाने प्रसिद्ध आहे. हे नृत्य स्त्री व पुरुष दोघे मिळून करतात. बासरी आणि ढोल साथीला असतात. संथगती आणि लास्यपूर्ण अभिनय या दृष्टीने हे नृत्य प्रेक्षणीय असते.

# मेघमंडित मेघालय

आकाशात विहार करणाऱ्या मेघानादेखील पृथ्वीवर घर करावेसे वाटले, आणि त्यानी त्यासाठी भारताच्या नैऋत्येकडील खासी पर्वतावरील शिलाँगचे पठार निवडले! खासीच्या शेजारालाच गारो-जयंतिया पर्वतमालाही आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यातील मोसमी वारे या पर्वताच्या प्रदेशात घुसतात. पण त्यातील शिलाँग पर्वत हा सर्वात उंच असल्यामुळे तो या वाऱ्याना तिथेच अटकाव करून ठेवतो. त्यामुळे त्या वाऱ्यानी आपल्याबरोबर आणलेले मेघ देखील तिथेच थबकतात. बरेच दिवस थाबतात. त्यामुळे जेव्हा पाहावे तेव्हा मेघ तिथे आहेतच. जणू त्यांनी इथेच घर केले आहे ! आणि म्हणूनच या प्रदेशाला ' मेघालय ' असे नाव मिळाले !

या प्रदेशातील सर्वात उंच पर्वतभागाला ' शिलाँग पीक ' असे म्हणतात. शिलाँग नावाची देवता या प्रदेशात रहाते अशी लोकश्रद्धा आहे. आणि त्या देवतेवरूनच शिलाँग हे नाव पडले. आणि म्हणूनच हा प्रदेश म्हणजे देवभूमी आहे, अशीही लोकभावना आहे. लोककथेमधून ही भावना व्यक्त झालेली आहे.

कोणे एके काळी या प्रदेशातील निन्तात सुंदर सृष्टीवैभवाने मोहित होऊन स्वर्गातील देव येथे येऊन राहात असत. येथील एका पहाडावर त्या वेळी खूपच लांब अशी एक लता होती. ही लता पृथ्वीपासून आकाशापर्यंत पोहोचलेली होती. आणि याच लतेच्या सहाऱ्याने स्वर्गातील देव पृथ्वीवर येत असत. त्या देवापैकी एकदा एका देवाच्या मनात अशी इच्छा उत्पन्न झाली की, आपण येथील राजा बनावे. आणि म्हणून त्याने एकदा संधी साधून आपल्या जवळील कुऱ्हाडीने ती लता तोडून टाकली. त्यामुळे स्वर्ग आणि पृथ्वी यामधील देवाचे जाणेयेणे कायमचे बंद झाले.

वेल तोडली त्या वेळी पृथ्वीवर सात देवता वस्ती करून होत्या. त्याना आता स्वर्गात जाणे अशक्य झाले. त्यामुळे त्या आपापल्या परिवारासह सात निरनिराळ्या

ठिकाणी जाऊन बसल्या. या ठिकाणानाच 'सातघरटी' असे नाव मिळाले. या सात घरट्यामधूनच सगळी मानवजात निर्माण झाली आहे, असे मानतात.

या घटनेनंतर बराच काळ गेला. माणसे आपल्या पूर्वजाना विसरली. त्याचे अज्ञानही वाढू लागले. त्याना निरनिराळ्या अडचणींना तोंड द्यावे लागले. अनेक संकटे पुढे ठाकली. परंतु शिलाग देवतेने आपल्या ह्या लेकराचा साभाळ केला. हिंस्र पशू व राक्षस याच्यापासूनही त्यांना वाचवले आणि माणसाचे अज्ञान दूर करण्यासाठी शिलाग देवाने 'का-पाह-शिन्यू' नावाच्या आपल्या मुलीला या प्रदेशात धाडले. का-पाह-शिन्यू ह्या नावाची ही एक लोककथा प्रचलित आहे :

हजारो वर्षांपूर्वी पोम लाकराई नावाच्या ठिकाणाजवळच 'माराईगुफा' नावाची एक गुहा होती. या गुहेच्या जवळच एक उंचच उंच डोंगर होता. या डोंगराच्या पायथ्याशी गुराखी आपली गुरे चरायला घेऊन येत असत. त्या वेळी तेथे ते हसत, नाचत असत. गाणी गात असत. बासरीही वाजवत असत. परंतु डोंगरावर चढण्याची हिंमत कोणीच करीत नसे. इथे याला 'दुर्गम डोंगर' असेच म्हणत असत.

एके दिवशी या डोंगरावर त्याना एक सुंदर मुलगी दिसली. त्या गुराख्यानी गावात येऊन ही बातमी सागितली. गाववाले आले. त्यानीही ती मुलगी पाहिली. ती खरोखरच इतकी सुंदर होती की सर्वांनाच ती आपल्या गावात यावी असे वाटले. म्हणून त्यानी निरनिराळ्या तऱ्हेचे आवाज काढून व आरोळ्या देऊन तिला बोलावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या मुलीने त्याच्याकडे लक्षही दिले नाही. जणुकाही आपल्याला ऐकूच येत नाही असे तिने दाखवले. मग गावकरी तेथे बसून ,विलाप करू लागले. परंतु त्याचाही त्या मुलीवर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी हताश होऊन लोक 'उ मालयम' नावाच्या गावातील सर्वात बुद्धीवान अशा माणसाकडे गेले. त्यानी त्यालाही खबर दिली. आणि त्या मुलीला खाली आणण्याचा आग्रह केला. उ-मालयमने त्याना पुष्कळसे बाबू आणून ते एकमेकाना बाधून त्याची एक बरीच लाब अशी शिडी तयार करायला सागितली. शिडी तयार झाल्यावर ती त्या डोंगराला लावण्यात आली. आणि त्या शिडीवरून खाली उतरण्याची खूण उ-माल्यमने त्या मुलीला केली. परंतु तरीही तिने दुर्लक्ष केले. लोक निराश होऊ लागले. त्याच वेळी डोंगराजवळ फुललेल्या लाल रगाच्या एका सुंदर फुलाच्या झुपक्याकडे उ-मालयमची दृष्टी गेली. त्याने तो सुंदर झुपका तोडला आणि बाबूच्या टोकाला बाधून त्या मुलीपर्यंत उंच तो नेला. त्या सुंदर लाल फुलानी मात्र

ती मुलगी आकर्षित झाली. ती फुले घेण्यासाठी तिने हात पुढे केला, त्याच वेळी उ-मालयमने तो बाबू हळूहळू खाली घेण्यास सुरुवात केली. फुलाच्या आकर्षणाने ती मुलगी शिडीवरून खाली आली. उ-मालयमने तिला आपल्या घरी नेले आणि आपली मुलगी मानून ठेवून घेतले. त्याने तिचे नाव ' का-पाह-शिन्यू ' असे ठेवले. याचा अर्थ फुलाच्या द्वारा आणलेली मुलगी असा होतो. ही मुलगी पुढे सुशील युवती झाली. ती गावच्या लोकाना भलाईचा सल्ला देत असे. गावची भाडणे ती सोडवीत असे. गावच्या लोकानी तिला ' का-सिएम ' अशी पदवीच देऊन टाकली. याचा अर्थ मुखराणी. या राणीने गावातील मुलींना सगीत व नृत्य शिकवले. शिलाँग देवाला गाणी व नृत्य आवडत होते, हे तिला माहीत होते. उ-मालयमने योग्य वर पाहून तिचा विवाह करून दिला. पुढे तिला दोन मुलगे व एक मुलगी झाली. ही मुले मोठी झाल्यावर ' का पाह-शिन्यू ' त्याना येथेच ठेवून स्वर्गात निघून गेली. तिची मुले समंजस व बुद्धिमान होती. त्या भागातील खासी लोकानी त्याना आपले ' सियेम ' बनवले. याचा अर्थ गावचा प्रमुख. या सिएमोनीच शिलाँग आपले पहिले राज्य निर्माण केले.

## साक्षी इतिहास

मेघालय हा प्रदेश परवा-परवापर्यंत आसाम राज्यातच समाविष्ट होता. आसाममधील गारो, खासी आणि जयंतिया या डोंगराळ भागाचे एक वेगळे राज्य स्थापन करण्यात आले. हे राज्य २२,४८९ चौ. किलो मीटर एवढ्या क्षेत्रफळाचे असून सुमारे दहा लाख लोकवस्ती येथे आहे आसाम राज्यात संयुक्त—खासी जयंतिया आणि गारो असे दोन डोगराळ जिल्हे होते. या भागात प्रामुख्याने खासी, जयंतीया आणि गारो या आदिम जमाती प्राचीन काळापासून वसती करून आहेत. त्यावरूनच या पहाडाना ही नावे मिळाली आहेत.

मेघालय राज्याच्या पश्चिमेला व दक्षिणेला बागला देश आहे, तर पूर्वेला उत्तरकछार डोंगर, आणि उत्तरेला आसामचे राज्य आहे. हे लोक पूर्वीपासूनच स्वतंत्र बाण्याचे असून इंग्रजी अमलातही ते इंग्रजापासून अलिप्त राहिलेले होते. या प्रदेशात पूर्वी सुमारे ५० लहानलहान संस्थाने होती. त्याचीही एक संघटना त्याकाळी स्थापन करण्यात आलेली होती.

या प्राचीन भूमीचा उल्लेख रामायण, महाभारत, पुराणे आणि तांत्रिक ग्रंथातूनही आढळतो. बऱ्याचशा परदेशी प्रवाशानीही या भूमीचा उल्लेख केलेला

आहे. त्यापैकीच एक प्रवासी काजीम म्हणून होता. त्याने तेथील फळे, लोखंड, सोने, तांबे वितळण्याची कला याची प्रशंसा केलेली आहे. तसेच रेशमी कपडे विणण्याच्या कलेचाही त्याने उल्लेख केला आहे. त्या वेळी तेथे स्वतंत्र टाकसाळी होत्या.

ही भूमी प्राचीन असली तरी हिचा लिखित इतिहास १६ व्या शतकापासून पुढचा उपलब्ध आहे. त्या वेळी आसाममध्ये अहोम राजाची राजवट होती. परंतु या डोंगरी प्रदेशात या जमातींचीच गणराज्ये अस्तित्वात होती. सियेम ' हाच या गणराज्यांचा प्रमुख असे. सियेम हा ' मिसिम 'या शब्दावरून आला असून त्याचा अर्थ ' जनतेची एकता ' असा आहे.

भटक्या टोळीप्रमाणे हिंडणारे खासी लोक आपआपले ' कुर ' म्हणजे परिवार बनवून खासी पर्वतात राहू लागले. जेथे राहिले तेथलेच ते शासकही बनले. त्याच्या कुरमधील सर्व तऱ्हेच्या कामाची जबाबदारी ' बिसन ' नावाच्या त्याच्या प्रमुखावर असे. बिसन हा वयस्कर इसम असे. बिसनला मदत करण्यासाठी अन्य सरदार असत. त्याना ' राग-बांग-शोंग ' असे म्हणत असत. कुरमधील धार्मिक कार्यांची जबाबदारी दुसऱ्या एका प्रौढाकडे असे, त्याला ' लिंडोह ' असे म्हणत. लिंडोह आणि बिसन मिळूनच 'कुर'चे शासन चालवीत असत. गावागावातून असलेल्या अशा अधिकाऱ्याचा दरबार भरत असे. तेथे आवश्यक ते कायदे केले जात असत आणि न्यायदानांची व्यवस्थाही असे. या दरबारच्या कामकाजात गावातील प्रत्येक प्रौढ सहभागी होत असे. जसजसा कामाचा व्याप वाढू लागला, तसतसे आणखी काही सरदार बिसन आणि लिंडोह यानी तयार केले. या सरदाराना सियेम म्हणत असत. या सियेमाचेच शासन या पहाडी भागात सर्वत्र सुरू होते. लोक याना राहण्यासाठी मोठे घर बाधून देत असत. त्याला ' इंग–साद ' असे म्हणत. सियेम हा आपल्या भागातील सर्वाधिकारीच असे. युद्धाच्या वेळी तो सेनापती बने आणि न्यायदानाच्या वेळी तो न्यायाधीश होई.

शिलाँग येथील सियेम राज्य हे सर्वात पहिले मानतात या सियेममधूनही अनेक वेळा सत्तेसाठी तटेबखेडे चालत असत. लहान लहान सियेमवर मोठी सियेम आक्रमणेही करीत असत. १८२४ साली बर्मी आक्रमणाच्या वेळी जयंतिया भागातील राजा उ रामसिंह याने इंग्रजाची मदत मागितली होती. इंग्रजानी त्याला मदत करून बर्मी लोकाना हाकलून दिले. परंतु इंग्रजानी या भागाचा कारभार संरक्षणाच्या नावाखाली आपल्याच हाताखाली ठेवला. अशाप्रकारे इंग्रजाचा प्रवेश या भागात झाला. वेळोवेळी या पहाडी लोकाचा आणि इंग्रजाचाही संघर्ष

झाला, परंतु त्याच्यातील झगड्याचा फायदा घेऊन इंग्रजानी आपले आसन तेथे बळकट केले. इंग्रजी सत्तेविरुद्ध येथील लोकाच्या मनांत असंतोष होताच. १९२३ साली 'खासी राष्ट्रीय दरबार' नावाचा राजकीय पक्षही त्यानी आपल्या मागण्यासाठी स्थापन केला होता.

स्वातंत्र्यानंतर या प्रदेशातील लोकाची आपले एक स्वायत्त पहाडी राज्य असावे अशी मागणी पुढे आली. परंतु त्या वेळी स्थापन झालेल्या राज्यपुनर्रचना-मंडळाने असे स्वतंत्र राज्य स्थापणे अव्यवहार्य असून ते वन्य जमातीच्या हिताचे ठरणार नाही या सबबीखाली त्याची मागणी मान्य केली नाही. मागणी फेटाळल्यामुळे या भागातील लोकामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता.

१९६० साली संपूर्ण राज्याची अधिकृत मागणी म्हणून असमीया भाषेला केंद्राने मान्यता दिल्यामुळे या लोकाच्या असंतोषात भरच पडली. केंद्र सरकार या डोंगराळ भागातील लोकाना आसाम राज्यान्तर्गत स्वायत्तता देण्यास तयार होते, परंतु अशा प्रकारची योजना येथील लोकाना पसंत पडली नाही.

१९६७ मध्ये आसाम राज्याची पुनर्रचना करण्याचे ठरले. आसामचे वेगळे विभाग करून त्याचा कारभार वेगळा चालवावा परंतु ते एका मोठ्या राज्याचे घटक म्हणून राहावे अशी योजना पुढे आली होती. परंतु या योजनेलाही येथील लोकानी मान्यता दिली नाही. आपल्या स्वतंत्र राज्याची त्याची आकांक्षा होती. अखेरीस मध्यवर्ती सरकारने त्याची इच्छा लक्षात घेऊन १९६९ सालच्या डिसेंबर महिन्यात 'मेघालय' हे एक वेगळे राज्य निर्माण करण्याचे विधेयक भारताच्या लोकसभेने मान्य केले.

एप्रिल १९७० मध्ये मेघालय या राज्याची स्थापना झाली; परंतु ते आसाम राज्याच्या अंतर्गतच होते. त्यात गारो, खासी-जयंतिया या दोनच जिल्ह्याचा समावेश होता. मिझो, मिकिर आणि कछांग हे पहाडी मुलूख त्यात सहभागी झाले नाहीत.

१९७१ सालच्या ऑक्टोबर महिन्यात आसामच्या मुख्यमंत्र्यांनी ईशान्य भारताच्या पुनर्रचनेसंबंधीचे विधेयक विधान सभेला सादर केले होते. या विधेयकान्वये मेघालय आसामच्या अंतर्गत स्वायत्त राज्य न राहता त्याला पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल असे घोषित करण्यात आले.

आसाम प्रदेशाचे विभाजन होऊन आसाम, नागभूमी, मेघालय, मणिपूर आणि त्रिपुरा ही पाच राज्ये आणि अरुणाचल व मिझोरम हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले. ईशान्य भारताची एकात्मता टिकवण्यासाठी हा


दा. क्र. २७५४९

निर्णय घेण्यात आला.

१९७१ सालच्या डिसेंबरमध्ये भारताच्या लोकसभेने या विधेयकाला मान्यता दिली आणि मेघालय नावाचे वेगळे राज्य कायदेशीररीत्या अस्तित्वात आले.

## लोक आणि लोकाचार

मेघालय राज्यात प्रामुख्याने खासी, गारो आणि जयंतिया या आदिम जमातीचे लोक राहतात. खासी लोक खासी व जयंतिया यातील डोंगरात वसती करून आहेत. फार प्राचीन काळी ब्रह्मदेशातून हे लोक इकडे आले असावेत. कारण याची भाषा, हत्यारे, भांडी आणि स्मारके इत्यादी ब्रह्मदेश व मलायामधील 'मोनख्मेर' वंशातील लोकाप्रमाणेच आहेत. हे वर्णाने तपकिरी असून त्याची नाके रुंद व बसकी आहेत. खासी पुरुष आखुड धोतर नेसतो, बिनबाह्याचा कोट घालतो आणि डोक्याला कानटोपी किंवा पागोटे घालतो स्त्रियाना रंगीत कपड्याची आवड असते. त्या सोन्याच्या व पोवळ्याच्या, मोत्याच्या माळा घालतात. चांदीच्या साखळ्या, बांगड्या कर्णफुले इत्यादी प्रकारचे दागिनेही वापरतात. स्त्रिया व पुरुष दोघेही लांब केस ठेवतात. धनुष्यबाण, ढाल-तलवार आणि भाले इत्यादी प्रकारची शस्त्रे हे लोक वापरतात.



खासी पुरुष

शेती हाच खासी लोकाचा मुख्य व्यवसाय आहे. भात, बटाटे, सुपारी इत्यादी पिके हे लोक करतात. तांदुळापासून एक प्रकारची दारु बनवतात. हा धंदाही मोठ्या प्रमाणावर चालतो. त्याशिवाय शिकार, मासेमारी, रानावनातील मध गोळा करणे इत्यादी उद्योगही पुरुष करीत असतात.

या लोकाची गावे लहान लहानच असतात, आणि ती डोंगरमाथ्यापासून थोडी खाली आणि वादळापासून संरक्षण होईल अशा जागी वसवलेली असतात. खासी लोकामध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती प्रचलित आहे. कुटुंबप्रमुख घरातील स्त्री असते आणि कुटुंबाच्या मालमत्तेचा वारसा सगळ्यात धाकट्या मुलीकडे जातो. विवाह झाल्यावरही ती माहेरीच राहते व तिचा पतीच आपल्या सासरी येऊन राहतो.

या लोकांत एकाच घराण्यात लग्ने होत नाहीत. बालविवाहाची प्रथा प्रथमपासूनच नाही. वधु-वर परस्पराच्या पसंतीने विवाह करतात. लग्नसमारंभाच्या वेळी पुरोहित सर्व देवाना पाचारण करून त्याच्या साक्षीने लग्न लागल्याचे घोषित करतो आणि वधुवराना सर्व प्रकारचे सामर्थ्य व समृद्धी देण्याबद्दल पूर्वजाची प्रार्थना करतो सर्व समारंभात वरचेवर मद्य शिपडण्याची प्रथा आहे. हा कार्यक्रम महत्त्वाचा मानला जातो.



खासी युवती

खासी लोक 'थु ब्लाय लोंग थाव' नावाचा एक देव मानतात. याची ते संकटाच्या वेळीच फक्त आराधना करतात. याच्यात मूर्तीपूजा नाही. सर्पदेवता आणि भूताखेतावर या लोकांचा विश्वास आहे. त्यांना प्रसन्न ठेवण्यासाठी पशुबळी दिला जातो. आपल्या पूर्वजाची पूजा करण्याची रूढी याच्यात आहे. अलीकडे बरेच खासी लोक स्वतःला हिंदू समजतात; आणि ते काली व महादेव यांची उपासना करतात. खिस्ती मिशनऱ्याच्या वास्तव्यामुळे आणि त्याच्या धर्म प्रसारामुळे बऱ्याच लोकानी खिस्ती धर्म स्वीकारलेला आहे.

याच्यात सणसमारंभही साजरे केले जातात. 'पोम ब्लांग' हा खासी लोकाचा सर्वांत मोठा उत्सव असतो. त्या वेळी राज्यदेवतेची आराधना केली जाते.

मे महिन्यात आणि त्यापूर्वी १०-१५ दिवस देवदेवताची पूजा-अर्चा चालू असते. उत्सवाच्या वेळी नृत्य चालते. स्त्री आणि पुरुष मिळून नृत्य करतात. आकर्षक अशी रेशमी वेशभूषा केलेल्या तरुणी फेर धरतात, आणि तरुण हातात चौऱ्या घेऊन त्याच्याभोवती नृत्य करतात. तरुणींच्या मस्तकावर चादीचा अथवा सोन्याचा टोप असतो. शरीरावर पुष्कळ अलंकार घातलेले असतात. तरुणही आकर्षक वेशभूषा करून डोक्याला पिसांचे तुरे लावतात. हातात ढाल-तलवार घेऊन युद्धाचा अभिनय करतात. तंगमुरी, ढोल, झाजा इत्यादी प्रकारच्या वाद्याची या नृत्याला साथ असते.

खासी लोकातही सिंतेंग, वार, भोई, लिंगम इत्यादी पोटभेद आहेत.

गारो लोकाची वसती गारो नावानेच ओळखल्या जाणाऱ्या डोंगर टेकड्यावर आहे. हे लोक स्वतःला 'आचिक' म्हणवून घेतात. याचा अर्थ डोंगर. ह्यावरून हे स्वतःला डोंगरी समजतात. याच्यातही अवे, चिसक, अटोंग, रुग, मेगम अशा अनेक पोटजाती आहेत या लोकाना स्वच्छ पाण्याने स्नान करण्याची आवड असल्यामुळे डोंगराच्या पायथ्याशी आणि नाल्याच्या शेजारीच याची वसती असते. टेकड्यावरील झऱ्यांचे पाणी बाबूच्या सहाय्याने गावात आणलेले असते. बाबू आणि गवत यांच्या सहाय्याने याची घरे बनवलेली असतात.

'डेकाचाग' नावाच्या सामुदायिक शय्यागृहात गावातील तरुण मुले झोपतात.

हे लोक मोंगोलाइड वंशाचे असून त्याचे नाक बसके व डोळे बारीक असतात. याच्यातील मागासलेले पुरुष लंगोटी लावतात व स्त्रिया कमरेभोवती फडके गुंडाळतात. स्त्रिया कानात पितळेची वळी व गळ्यात मण्याच्या माळा घालतात.

गारो शेतकरी झूम पद्धतीची शेती करतात. भात, कापूस, मिरची आणि कडधान्ये इत्यादी पिके ते करतात. भात आणि मास हे त्याचे मुख्य अन्न आहे.

गारो जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. याच्या घराण्याना 'मंचोंग' म्हणतात. एकाच मचोंगमधील मुलामुलींची लग्ने होत नाहीत. लग्न झाल्यावर मुलगाच मुलीच्या घरी रहावयास जातो. विवाहाच्या वेळी मेजवानी आणि नृत्यगायन चालते. याच्या जमातीमध्ये एखादा वादग्रस्त प्रश्न उत्पन्न झाला तर सर्व स्त्रीपुरुष एकत्र येऊन त्याचा विचार करतात.

भुताखेतावर गारो लोकाचा विश्वास आहे. त्याना 'सोंगसरेक' म्हणतात.

‘ सालगाँग ’ हा गारोंचा मुख्य देव आहे. ख्रिस्ती लोकाच्या धर्मप्रचारामुळे काही लोकानी ख्रिस्ती धर्म स्वीकारलेला आहे.

जयंतिया डोंगरावर वसलेल्या जमातीला जयंतिया म्हणतात. हे ऑस्ट्रिक वंशाचे असून ते चीनमधून आसामात आले असावेत असा अंदाज आहे. त्याचा वर्ण उजळ व बाधा पिळदार असतो. हे लोक लढाऊ बाण्याचे असल्यामुळे धनुष्यबाण व ढाल-तलवार ही शस्त्रे ते सतत जवळ बाळगतात. याची ढाल खूप मोठी असते. तिचा ते छत्रीसारखाही उपयोग करतात. भात हे याचे मुख्य अन्न आहे. याच्यात मालमत्तेचा वारसा मुलाला न मिळता बहिणीच्या मुलाला मिळतो. पूर्वीच्या काळी राजपदही राजभगिनीच्या मुलालाच मिळत असे. राजाच्या बहिणीला कुंवरी म्हणत असत.

याच्यात विवाहविधी जवळजवळ नाहीतच. तरुणाने आपल्याला पसंत असलेल्या तरुणीला मागणी घालायची आणि तिच्या आईवडिलानी संमति दिल्यावर एकत्र रहायचे. ते केव्हाही घटस्फोट घेऊ शकतात. दोघेही एकमेकाकडून घेतलेले शिंपले फेकून देतात व काडीमोड जाहीर करतात.

भूताखेतावर या लोकाची फार श्रद्धा आहे. भूताची दगडी स्मारके बनविण्याची प्रथा याच्यात रूढ आहे. शिक्षण, कलाकुसर इत्यादी बाबतीत हे लोक बरेचसे मागासलेले आहेत.

**भाषा आणि साहित्य**

या प्रदेशात खासी, गारो याच भाषा त्या त्या भागामध्ये वापरल्या जातात. या भाषाच्याही अनेक उपभाषा किंवा बोली प्रचलित आहेत. खासी भाषा ही भारतामधील इतर मूळ देशी भाषामधून बरीच वेगळी भाषा आहे. मूळ धातूंचे उच्चार या बाबतीत तिचे मंगोलियन भाषाशी साम्य आहे. खासी व हिंदुस्थानातील इतर अनार्य भाषा यात मुख्य फरक आहे तो म्हणजे खासी भाषेत प्रत्येक नामाचे लिंग ठरलेले असते. मग स्त्री, पुरुष, वस्तू असा भेद त्यात असो अथवा नसो. काही भाषा पंडिताच्यामते खासी भाषा ही इंडो-चिनी भाषापैकी एक आहे. परंतु अलीकडे मोनख्मेर भाषाशीच तिचा संबंध असल्याचे सिद्ध झाले आहे. १८ व्या शतकापर्यंत खासी भाषा बंगाली लिपीत लिहिली जात असे. परंतु पुढे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ख्रिस्ती धर्मप्रचारकानी ती भाषा रोमन लिपीत लिहिण्यास प्रारंभ केला व त्या भाषेत साहित्य लिहून तिला स्थैर्य आणले.

गारो लोक तिबेटी भाषा आणि लिपी याचा देखील वापर करत असत- अलीकडे गारो लोकही रोमन लिपीचा वापर करतात. सर्वात प्रथम या भाषामधून ' न्यू टेस्टामेंट 'चा अनुवाद प्रसिद्ध झाला. श्री. आणि श्रीमती जोन्स या दंपतीने १८४१ मध्ये प्रथम 'खासी प्रवेशिका' आणि स्वच्छतेचे पुस्तक लिहिले. त्यानंतरच्या काळात ' खासी भाषा-परिचय ' आणि ' खासी-आंग्ल शब्दकोश ' तयार करण्यात आले. मिशनऱ्यानी आपल्या धर्मप्रचारासाठी या काळात बरीच पुस्तके आणि पत्रके तयार केली होती. १८९५ नंतर शिक्षणाच्या संपर्कामुळे येथील लोक स्वतः साहित्य निर्मिती करू लागले.

' उजिबोन रोब ' यानी खासी लोकांच्या धर्मावर पुस्तक लिहिले. हे खासीतील केवळ पहिलेवहिले लेखक होते एवढेच नव्हे तर खासी संस्कृतीचे पुनरुत्थान करणारे म्हणूनही त्याना मानले जाते. यानी आपल्या पुस्तकाच्या द्वारा खासी लोकामध्ये धर्मजागृती केली. ते शिक्षणतज्ञही होते. १८९९ मध्ये शिलाँग येथे त्यानी पहिला खासी प्रेस उघडला. खासी संस्कृतीला संजीवन देण्यासाठी त्यानी ' सेंग खासी ' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेने तेव्हापासून केलेल्या कार्याची फळे आजच्या पिढीला चाखावयास मिळत आहेत. त्यानी पुष्कळशी पाठ्यपुस्तकेही लिहिली. शिलाँगमध्ये सरकारी नॉर्मल स्कूल सुरू करण्याची त्यानी तत्कालीन सरकारकडे प्रथमतः मागणी केली होती.

उ-राबोन सिंह हे दुसरे एक नामवंत लेखक होऊन गेले. हे विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध होते ' खासी धर्म ', ' खासी बलिदान आणि उत्सवाचा इतिहास ' व ' खासी लोककथा ' अशी तीन पुस्तके त्यानी लिहिली. त्याच्या लेखनातून अनेक तरुण लेखकाना प्रेरणा लाभली.

सर्वश्रेष्ठ ईश्वर, खासी स्मारक, धर्म आणि श्रद्धा या विषयावर शिवचरण रॉय यानी ग्रंथनिर्मिती केली. त्यानी लिहिलेल्या लघुकथाचा संग्रह प्रसिद्ध आहे. १८८५ मध्ये हनुमान रॉय यानी ' उ-खासी मिंगा ' नावाचे वृत्तपत्र काढले. त्यानंतर १९०३ मध्ये ' उ-नोंग-फोंग ' नावाचे वृत्तपत्र जीवनरॉय यानी काढले होते. व्ही. के. रॉय यानी इतिहास, आरोग्य व व्याकरण यावर ग्रंथनिर्मिती केली. त्यानंतरच्या काळात आणखी बरीच वृत्तपत्रे व नियतकालीके निघाली. स्वतंत्र पुस्तके व अनुवादही प्रसिद्ध झाले. राधीनसिंह बेदी हे अर्वाचिन काळातील प्रारंभीचे कवी मानले जतात. यानी खासी म्हणींच्या आधारावर रचलेला कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. सोसे थाम याना श्रेष्ठ कवी मानले जाते. १९२५ मध्ये त्यानी ' की

पोएट्री खासी ' आणि ' का दुई तारा कसियार' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध केले. त्यानी इसापच्या गोष्टींचाही अनुवाद केला. याच्या शिवाय उ थाक क्यू, पि गातफोह, एच ॲलायस्, व्ही. जी. बहेर इत्यादी कवीहि प्रसिद्ध आहेत.

खासी भाषेतील साहित्य अप्रगट अवस्थेतून प्रगतिची वाटचाल करत आहे. गारो पहाडावरील लोकसाहित्यासंबंधी अलिकडे बरेच लिखाण प्रसिद्ध झाले आहे. खोसाग यानी जुने महाकाव्य 'काथासालिंग' या नावाचे लिपीबद्ध करून प्रसिद्ध केले आहे. 'काथासालिंग,' 'काथाआगाना' आणि 'दोपेआगाना' अशी तीन महाकाव्ये गारो प्रदेशात लोकाच्या गाण्यात पूर्वीपासून होती. हळूहळू ती विस्मृतीत जात चालली आहेत. ही महाकाव्ये गाणाऱ्या गायकाना ' अगानगिपा असे म्हणतात.

सर्वच बोली भाषामधून लोकगाते आणि लोककथा प्रचलित आहेत. आपल्या जमातीची उत्पत्ती, धर्म, देवदेवता, निसर्ग, शेतीवाडी इत्यादी विविध विषयावर लोकगीते आहेत.

**कलाप्रिय मेघालय**

भारतातील अन्य आदिम जमातींप्रमाणेच खासी, गारो इत्यादी लोकाच्या जीवनात नृत्य-संगीताला स्थान आहे. खासी लोक ' नोंगक्रेम ' नावाचे नृत्य उत्सव-प्रसंगी करतात. या नृत्यात स्त्री व पुरुष दोघेही भाग घेतात. नर्तिका नजर खाली वळवून सावकाशपणे हातवारे करीत एकत्र उभ्या रहातात आणि नर्तक याक बैलाच्या शेपट्या हातात घेऊन त्याच्याभोवती नृत्य करतात.

' क-शद्-व्हींमोह ' हे खासी लोकाचे एक वैशिष्ट्यपूर्ण नृत्य आहे. याही नृत्यात स्त्री व पुरुष भाग घेतात. आकर्षक पद्धतीची वेशभूषा केलेल्या नर्तकी पार्श्व-भूमीप्रमाणे द्रुतगतीत नृत्य करीत असतात आणि त्याच्यापुढे विविध वृक्षाच्या हिरव्या पानांनी लहडलेल्या फाद्या उचलून नर्तक नृत्य करतात.

वसंत ऋतूमध्ये खासी किसान विविध प्रकारची नृत्ये करतात. साथीला तंगमुरी, ढोल, नगारा, झाजा इत्यादी वाद्ये असतात. 'पासतीह' आणि 'नासतीह' नावाची द्रुत गतीतील नृत्ये पुरुष नर्तक करतात. या वेळी ते तुंबळ युद्धाचा आभास निर्माण करतात. नर्तकाच्या हातात ढाली-तलवारी असतात.

जयंतिया लोकामध्ये ' उत्सव चमेली ' हे नृत्य विशेष लोकप्रिय आहे.


गारो लोकामध्ये 'बागनाला' नावाचे नृत्य लोकप्रिय आहे. सुगीच्या दिवसात ' मानगोना ' आणि ' साराम ' नावाची नृत्ये गारो शेतकरी करतात. ' ऐमराग क्रुता ', ' सोंगाडिंग क्रुता ' ही गारो लोकाची धार्मिक उत्सवाच्या वेळी करावयाची

नृत्ये आहेत. या नृत्याना ड्रुम म्हणजे ढोल, बासरी, झाज, तुरही, तास इत्यादी वाद्याची साथ असते.

मेघालय राज्याची राजधानी शिलाँग येथे आहे. येथील अप्रतिम सृष्टी-सौंदर्यामुळे शिलाँगला 'पहाडाची राणी' असेही म्हटले जाते. चीडच्या वृक्षानी झाकलेल्या पर्वताच्यामध्ये शिलाँग शहर वसलेले आहे. शहराच्या आसपास बरीच सरोवरे आणि पाण्याचे धबधबे आहेत.

चेरापुंजी हे खासी प्रदेशातील दुसरे महत्त्वाचे शहर आहे. पूर्वी येथे आसामची राजधानी होती. चेरापुंजी हे जगातील सर्वांत अधिक पाऊस पडण्याचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. चेरापुंजीजवळच भाऊसिराम नावाचे गाव असून अलीकडे चेरापुंजीपेक्षा अधिक पाऊस येथे पडतो.

दगडाची बनवलेली स्मारके मेघालय राज्यात ठिकठिकाणी दृष्टीस पडतात.



दगडी स्मारके

मातीची भांडी, लाकडाच्या वस्तू फारच सुंदर रीतीने येथील कलाकार बनवतात. सुंदर सुंदर चित्रानी सजवलेल्या वा वस्तू आकर्षक असतात.

स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाल्यानतर मेघालयातील आर्थिक विकासाची वाटचालही प्रगतीच्या दिशेने सुरू झालेली आहे.

# उद्यानभूमी सिक्किम

भारताच्या ईशान्येला हिमालयाच्या कुशीत सिक्किम हे राज्य वसलेले आहे. सिक्किम आणि भारताचा सांस्कृतिक संबंध प्राचीन काळापासून आहे. राजकीय दृष्ट्याही सिक्किम आणि भारत हे फार निकटचे शेजारी होते. सिक्किमसारख्या छोट्या परंतु नव्यानेच स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या देशाला भारताने सदैव आपलेपणाने सहाय्य केलेले आहे. सिक्किमच्या जनतेच्या भावभावना आणि आकांक्षा भारतीय जनतेशी आणि संघराज्याशी निगडीत झालेल्या आहेत. आणि म्हणूनच १९७५ साली तेथील जनतेने भारतीय संघराज्यातच विलीन होण्याची इच्छा प्रकट केल्यावरून सिक्किम हा प्रदेश आता भारतीय संघराज्यातील एक पूर्ण राज्य म्हणून भारताच्या नकाशात दाखल झालेला आहे.

कांचनगंगा हे हिमालयातील बर्फाच्छादित शिखर आहे आणि याच्या छायेतच सिक्किमची भूमी येते. कांचनगंगाचे हे तिबेटी नाव ' खाङ्-छेन-जोङ्-घा ' असे आहे. याचा अर्थ पंचनिधींचा पर्वत. सिक्किम-भूमीचा आदि सृष्टीकरता ईश्वर याचे हे निवासस्थान आहे, अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. प्राचीन पुराणकथामधून कांचनगंगाचे वर्णन केलेले आहे. पंचनिधींचे प्रतीक म्हणून या पर्वतश्रेणींमध्ये पाच उंच शिखरे दाखवली जातात. हा पर्वत दुर्लंघ्य असून याची उंची २८,१६८ फूट आहे. कांचनगंगा हे शिखर जगातील तिसऱ्या क्रमाकाचे उंच शिखर मानले जाते.

सिक्किम प्रदेशाला आणखी दोन नावे आहेत. नेपाळी लोक याला ' सुक्खिम ' म्हणून संबोधतात. याचा अर्थ सुंदर, नवीन घर असा होतो. नेपाळी लोक आपल्या नेपाळ प्रदेशातून प्राचीन काळी इकडे येऊन वसले तेव्हा त्या आलेल्या लोकांना हे सुंदर नवीन घरच वाटले असावे. तिबेटी आणि लेपचा जमातींचे लोक या प्रदेशाला ' डेनजोङ् ' असे म्हणतात. याचा अर्थ धान्याचे गुप्त खोरे असा आहे.

हिमालयाच्या पूर्वेला सिक्किम हे राज्य येते. याच्या उत्तरेला तिबेटचे विस्तृत पठार आहे तर पश्चिमेला नेपाळचा पूर्वभाग आहे. पूर्वेला भूतान आणि चुंबिघाटी असून दक्षिणेकडे पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगचा शेजार आहे.

या छोट्याशा राज्याचे क्षेत्रफळ २,८१८ चौ. मैल आहे. याची दक्षिणोत्तर लांबी ७० मैल आहे तर पूर्वपश्चिम ४० मैल आहे. या भूमीच्या चोहोबाजूला पर्वतमाला आणि घनदाट जंगल आहे. या जंगलामध्ये शाल, चीड, शिशम, धुप्पी, भूर्ज इत्यादी विविध प्रकारचे वृक्ष आहेत. त्याचप्रमाणे विविध रंगाची आणि गंधाची फुलझाडेही विपुल आहेत. 'रोडोडेन्ड्रोन' नावाच्या फुलाची बरीच गर्दी या प्रदेशात दिसते. यातही ४० प्रकारची फुले असून हंगामाच्या वेळी पर्वताच्या उतारावर आणि दऱ्यामध्ये याची शोभा आगळीच दिसते. सिक्किमला लाभलेल्या या अपूर्व सृष्टीसौंदर्यामुळे याला 'हिमालयाचे उद्यान' असेही म्हटले जाते.

या प्रदेशात पाऊसही भरपूर पडतो. येथील वर्षाऋतूचा काळ मे पासून ऑक्टोबरपर्यंत असतो. येथील जमीनही उपजाऊ आहे. शेती हा येथील लोकांचा प्रमुख धंदा असून भात, मास, मासे, हेच येथील प्रमुख अन्न आहे. संत्र्याच्याही येथे बागा असून त्यापासून मद्ये तयार केली जातात.

या प्रदेशात लहानमोठ्या बऱ्याच नद्या आहेत. त्यात 'तिस्ता' आणि 'रंगीत' या दोन प्रमुख नद्या आहेत. तिस्ता नदी हिमालयात उगम पावून सिक्किमच्या प्रदेशातून वहात जाऊन बंगालकडे वळते. हिचा प्रवाह अत्यंत वेगवान आहे. सिक्किमच्या जंगलात विविध तऱ्हेचे पशुपक्षीही विपुल आहेत. हिमालयात रहाणारे चित्ते, काळ्या व भुऱ्या रंगाची अस्वले, साबर, हरीण, आणि वाघही या जंगलात आढळतात. कपोत, बाबलर, कुक्कू, लाल राजा, बुल्बुल इत्यादी विविध तऱ्हेचे पक्षी आहेत. गुलाबी पायाचा तिबेटी कावळा उत्तर सिक्किमच्या जंगलात आढळतो.

या भूमीत खनिजसंपत्तीही भरपूर आहे. त्यात तांबे हा धातू बराच मिळतो. रोपू, बेआड, पाक्योंड आणि रोडाथाड या भागात तांब्याच्या खाणी आहेत.

सिक्किम या नव्या राज्याची राजधानी 'गंगटोक' नावाच्या शहरात आहे. या राज्याची लोकसंख्या २०,८६०९ इतकी आहे. बौद्ध धर्माचा बराच प्रसार येथे प्राचीन काळापासून बराच झालेला असून ठिकठिकाणी बौद्ध-विहार बांधलेले आढळतात. या प्रदेशात राहणारे नेपाळी लोक मात्र हिंदु धर्माचे आहेत. हिंदु आणि बौद्ध यांच्यात खूपच सहकार्य आणि सामंजस्य येथे आढळते.

## साक्षी इतिहास

दोन-तीन शतकापूर्वी लेपचा आणि भूतीया या तेथील दोन जमातींमध्ये दीर्घकाळ पर्यंत आपसात राजकीय भांडण-तंटे सुरू होते. याचे पर्यवसान अर्थातच तेथील शासनसंस्था खिळखिळी होण्यात झाला होता. या दोन्ही जमातींना एक-मेकाचा राजा पसंत नव्हता. भांडणाचा निकाल लागेना तेव्हा त्यानी तिबेटमधील आपला धर्मगुरू लामा याच्याशी विचारविनीमय केला आणि एका परकी राजाची सत्ता त्यानी मान्य केली. तिबेटमधील खाब नावाच्या प्रदेशातील हा राजा होता. राजाच्या शोधात तीन लामाचे एक पथक त्या प्रदेशात गेले असता त्याना तेथे राजा होण्यालायक एक तरुण आढळला. त्या तरुणाच्या कुंडलीतही राजयोग होता. त्या तीन लामानी सिक्कीमचा राजा होण्याची विनंती केली आणि त्यानेही ती मान्य केली. मग तो आपल्या घराण्यातील काही लोकाबरोबर सिक्किम प्रदेशात आला आणि सिक्किमचे राजपद त्याने स्वीकारले.

१६०४ मध्ये फुन्छोब नामग्यान हा सिक्किमचा पहिला धार्मिक राजा बनला. आणि त्याने खंबीर सरकारची स्थापना केली. त्यावेळी त्याच्या राज्याचा विस्तार फारच मोठा होता. १८ व्या शतकात अंतर्गत भांडणे व परकीय आक्रमणे यामुळे सिक्किमला आपली बरीचशी भूमी गमवावी लागली. भूतान आणि नेपाळ येथील तत्कालीन शासकानी सिक्किम राज्याची बरीच भूमी त्या वेळी बळकावली.

पूर्वी दार्जिलिंग जिल्ह्याचा बराच भाग सिक्किममध्ये होता, परंतु १८३५ साली इंग्रजाच्या ईस्ट इंडिया कंपनीने हा भाग आपल्या ताब्यात घेतला.

उत्तरेला तिबेटशी सिक्किमचे झगडे चाललेले होतेच. इंग्रजानी त्यात पडून १८४० साली चुंबी खोऱ्याचा भाग तिबेटच्या शासनाकडे दिला.

या प्रदेशाच्या लुटालुटीला उद्देशून सिक्किमच्या इतिहासात मोठ्या दु:खाने नमूद केले आहे की, " दक्षिणेच्या बाजूने हत्तींचा कळप, पूर्वेकडून वानराची टोळी आणि उत्तरेच्या बाजूने सुसरींची झुंड यानी आम्हाला लुटले आहे." याचा अर्थ असा ब्रिटिश हत्ती, गुरखा वानर, आणि तिबेटी सुसरी यानी सिक्किमच्या भूमीचे तुकडे गिळंकृत केले.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या काळात सिक्किम देशात बऱ्याच उलाढाली झाल्या. भारताप्रमाणेच हाही प्रदेश इंग्रजाच्या ताब्यात १९ व्या शतकातच आला होता १९५० साली भारतसरकार आणि सिक्किमचे तत्कालीन

महाराजा ताशि नामग्याल याच्यामध्ये मैत्रीचा व शांतीचा करार झाला. त्यानंतर १९५२ साली भारताचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यानी सिक्किमची मैत्रीयात्रा केली. त्या वेळी सिक्किमच्या विकास– योजनानाही भारत मदत करील असे आश्वासन त्यानी तेथील महाराजाना दिले. मध्यंतरीच्या काळात 'सिक्किम स्टेट काँग्रेस' या एका राजकीय पक्षाने सिक्किम प्रदेश भारतीय संघराज्यात विलीन करावा असा ठराव पास केला. परंतु 'सिक्किम नॅशनल पार्टी'चा याला विरोध होता. त्याना भारताशी केवळ मैत्रीच हवी होती. 'सिक्किम स्टेट काँग्रेसच्या' ठरावाने सिक्किममधील विलीनीकरणास विरोध करणारे लोक क्षुब्ध झाले होते. या राजकीय घडामोडींमुळे तेथील प्रशासन व्यवस्थित चालवण्यासाठी सिक्किमच्या महाराजानी भारताच्या सरकारकडे एक प्रशासक पाठविण्यासंबंधी विनंती केली. त्यावरून भारत सरकारने आपला प्रशासक सिक्किम येथे पाठवला होता. या प्रशासकाने तेथील सूत्रे हाती घेतल्याबरोबर तेथे प्रथमतः कर-वसुलीची पद्धत सुरू केली. जमीनदारी प्रथा संपवून टाकली. 'सिक्किम स्टेट काँग्रेस' आणि 'सिक्किम नॅशनल पार्टी' याच्यात समझोता घडवून आणला आणि 'स्टेट कौन्सिल' अस्तित्वात आले. या कौन्सिलमध्ये १७ सदस्य होते. सिक्किममध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ साली झाली.



नेपाळी स्त्री

२३ एप्रिल १९७५ रोजी सिक्किम प्रदेशाचे भारतीय संघराज्यात विलीनी-

करण झाले आणि सिक्किम हे भारतीय संघराज्यातील २२ वे पूर्ण राज्य म्हणून अस्तित्वात आले.

**लोक आणि लोकाचार**

सिक्किम प्रदेशात लेपचा, भूतिया, नेपाळी या प्रमुख तीन जमाती वसती करून आहेत. लेपचा जमातीमध्येही रॉंग आणि खाब अशा दोन उपजाती आहेत. रॉंग म्हणवून घेणारे लेपचा स्वतःला त्या प्रदेशातील आद्य नागरिक मानतात आणि खाब जमातीमध्ये राजघराण्यातील लोकांचा अंतर्भाव होतो.

या जमातीमधील लोक मंगोलियन वंशाचे आहेत. हे पीतवर्णी आणि ठेंगणे असतात. रुंद व चपटा चेहरा आणि बसके नाक पाहताक्षणीच ते लक्षात येतात. पुरुष केस वाढवतात आणि त्यांचा आंबाडा बांधतात. वृद्ध पुरुष केसांच्या वेण्या घालतात. स्त्रिया आपल्या वेणीच्या टोकाला रेशमी गोंडे बांधतात. स्त्री व पुरुष यांचा पोषाख सारखाच असतो. जाड्याभरड्या रेशमी कापडाचा अंगरखा व त्यावर लोकरीचे जाकीट एवढाच त्यांचा पोषाख असतो. जाकिटावरून ते कमरेला एक चांदीच्या साखळ्यांचा पट्टा बांधतात.

लेपचा लोक अस्वच्छ पण स्वभावाने प्रेमळ, आनंदी आणि खिलाडू वृत्तीचे आहेत. ते प्रामाणिक आहेत, पण आळशीही आहेत. घोड्यांच्या शर्यती, धावण्याच्या शर्यती, कुस्त्या, उड्या मारणे इत्यादी खेळ त्यांना फार प्रिय आहेत.

लेपचा जमातीतील लोक वृत्तीने भटके आहेत. एके ठिकाणी ते तीन वर्षे राहतात. त्यानंतर दुसरीकडे जातात. तेथे आपली एक झोपडी बांधतात. जंगल तोडून शेतीसाठी जमीन तयार करतात आणि भात, मका, गहू, जव व इतर धान्य ते तेथे पिकवतात. कुदळ, खुरपे यांच अवजारांनी ते शेती करतात. जंगलातील फळे, कंदमुळे आणि प्राण्यांचे मांस यावरच ते आपली उपजीविका करतात. शिकारीसाठी ते मोठा सुरा व धनुष्यबाण वापरतात मका आणि मुरवा धान्यापासून बनवलेली दारु ते पितात.

लेपचा तरुण-तरुणींचे विवाह मोठेपणी होतात. मुलीसाठी ४० ते १०० रुपयांपर्यंत देज द्यावी लागते, म्हणजे हुंडा द्यावा लागतो. पैसे नसतील तर एखादा गरीब तरुण कर्जाऊ पत्नी मिळवतो म्हणजे वधूची किंमत फिटेपर्यंत त्याला वधूच्या घरी तिच्या बापाची चाकरी करावी लागते. अगदी साध्या पद्धतीने आधी वधूच्या आणि नंतर वराच्या घरी लग्नविधी पार पडतो. या वेळी वधूवरांना एका

गालीच्यावर बसवितात. धर्मगुरू लामा त्याच्या गळ्याभोवती लोकरीचे गळपट्टे बांधतो. नंतर ते सोडून त्यांची अदलाबदल करतो. वधू-वराच्या मस्तकावर अक्षता वहातो. त्यानंतर वधू-वर एका पानात जेवतात व एकाच पेल्यातून दारु पितात. अभ्यागतांना मेजवानी दिली जाते.



प्रार्थना-चक्र

लेपचा जमातीतील बहुसंख्य लोक बौद्ध धर्मीय आहेत; पण बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी ते निसर्गधर्मीय होते त्याचे अवशेष अजूनही त्यांच्यात आढळतात. निसर्गातील निरनिराळ्या शक्तींची ते पूजा करतात. निसर्गातील काही शक्ती दुष्ट,

तर काही दुष्ट असतात अशी त्याची भावना आहे. त्याचे प्रमुख दैवत म्हणजे हिमाच्छादित कांचनगंगा पर्वत होय. हा देव जर कोपला तर तो हिमवादळे घडवतो, गाराचा वर्षाव करतो आणि कडे कोसळवून माणसाचा संहार करतो अशी याची श्रद्धा आहे. बौद्ध होण्यापूर्वी ते महादेव आणि उमा याची पूजा करत असत. फळाफुलाबरोबरच ते देवाला मद्यमासही अर्पण करतात. पुजाऱ्याला ते बिजुआ असे म्हणतात. बौद्ध लेपचा जमातीचे पौरोहित्य तिबेटी लामांकडे असे. देवाप्रमाणेच त्याचा मृतात्म्यावर विश्वास असतो.

भूतिया लोकही मंगोलियन वंशाचे आहेत. हे लोकही बौद्धधर्मी असले तरी मूळची निसर्गपूजा त्यानी सोडली नाही. सर्वसामान्य भूतिया लोक भुताखेताना भजतात. त्याना फुले व चिंध्या अर्पण करतात. अनेक भूतिया स्त्रीपुरुष भिक्षुक व लामा बनतात. लामा डाव्या खांद्यावरून एक लोकरीची शाल अंगावर टाकतात. लामा आणि इतर लोकही 'मणिपद्मे हुम्' या मंत्राचा जप करतात. जप-माळा-प्रमाणेच जप करण्याची यंत्रेही असतात.

सिक्किममध्ये विविध जातीजमातींचे लोक आपापल्या भाषा बोलतात. आदिवासी लेपचा 'रोंगके' नावाची भाषा बोलतात. गंगटोक शहरातील लेपचा लोक नेपाळी भाषेचा वापर चांगल्या तऱ्हेने करू शकतात. बौद्ध लेपचाना तिबेटी भाषा अवगत असते; कारण त्याची धार्मिक पुस्तके तिबेटी भाषेतच असतात. राई, लिंबू, गुरुंग, इत्यादी जमातींच्या बोली भाषा आहेत. येथे येऊन वसलेले नेपाळी नेपाळी भाषेतच आपला व्यवहार करतात. त्याच्या सहवासाने येथील पुष्कळशा लोकाना नेपाळीही येते. भूतिया लोक तिबेटी भाषेतच बोलतात आणि लिहितातही. सिक्किममध्ये शासकीय भाषा इंग्रजी आहे. शाळामधून इंग्रजी आणि तिबेटी भाषा शिकवली जाते. बौद्ध धर्माचा बराच प्रसार झालेला असल्यामुळे त्याचे कंचूर आणि तंजूर हे तिबेटीमधील ग्रंथ वाचण्यासाठी बऱ्याच लोकाना तिबेटी भाषाही शिकावी लागते. लेपचा लोकाच्या भाषेत तसे लिखित साहित्य नाही. परंतु लोककथा आणि लोकगीते याच्यातही भरपूर आहेत.

अलीकडे लेपचा भाषेतील लोकसाहित्य नेपाळी भाषेच्या द्वारा उपलब्ध होऊ लागली आहे नेपाळी साहित्याची निर्मिती मात्र सिक्किममधील नेपाळी समाजातील लेखक करीत असतात.

' काचनगंगा ' नावाचे एक वृत्तपत्रही सिक्किम सरकारच्या मार्फत नेपाळी भाषेत प्रसिद्ध होत असते.

**कलाप्रियता**

सिक्किमचे लोकही रसिक आणि कलाप्रिय आहेत. नृत्यसंगीताची त्यानाही बरीच आवड आहे. सिक्किममध्ये 'मुखवटा' नृत्य फार लोकप्रिय आहे. हे नृत्य पुरुष नर्तक करतात. नृत्याच्या वेळी वापरावयाचे मुखवटे क्रूर आणि भयानक असे असतात. ढोल आणि रणवाद्याच्या तालावर हे नृत्य जेव्हा उड्या मारीत आणि आरोळ्या ठोकीत नर्तक करतात तेव्हा सारे वातावरण दणाणून जाते. या नृत्याला सिंगी किंवा सिंहनृत्य असे म्हणतात. याचे कारण असे की काचनगंगा हा या लोकाचा पवित्र व देवतास्वरूप पर्वत आहे. या पवित्र शिखरावर माणसाचा पाय लागला तर तो अपवित्र होईल अशी त्याना भीती वाटते. येथील चित्रकार काचनगंगा देवतेला सिंहावर आरूढ झालेली विक्राळ अशा देवतेच्या स्वरुपात चित्रित करतात. काचनगंगेला सिंहदेवताही म्हटले जाते. यावरून या नृत्याला सिंहनृत्य असे म्हणतात. सप्टेंबर महिन्यात गंगटोकमध्ये काचनगंगेचा उत्सव साजरा करण्यात येतो. या वेळी सर्व सिक्किम राज्यभर दोन दिवसाची सुट्टी असते. या वेळी सर्वत्र सिंहनृत्य नाचले जाते.

फेब्रुवारी महिन्यात ' लोसार ' या नावाचा सिक्किमी लोकाचा नववर्षाचा प्रथम दिवस मोठ्या उत्सवाने साजरा केला जातो. त्या वेळीही विविध प्रकारची नृत्ये सादर केली जातात. विविध जमातींमध्येही त्याची त्याची अशी नृत्ये आहेत. लिंबू आदिवासींमध्ये भाताचे पीक तयार होण्याच्या वेळी ढोल-नृत्य केले जाते. तामंग आदिवासींमध्ये दंफू नावाचे नृत्य केले जाते, तर नेपाळी लोक मारुनी नावाचे नृत्य करतात. या नृत्यात पुरुषच स्त्रीयाची वेशभूषा करून नृत्य करतात. त्या नृत्याच्या वेळी विविध आशयाची गीतेही गायली जातात.

♠ ♠

# लोकसाहित्य

लोकसाहित्य ही त्या त्या भाषेची अमूल्य अशी संपदा आहे. लोकभावना, लोकाचार आणि लोकस्थिती याचे दर्शन लोकसाहित्य घडवीत असते. प्रत्येक भाषेत, आणि बोलीत असे साहित्य आहे. त्या त्या प्रदेशातील लोकाच्या स्मरणात ते ताजे असते. 'नागभूमी' आणि 'मेघालय' ह्या राज्यातील दोन लोककथा येथे वानगीदाखल दिल्या आहेत :

**नागभूमीतील लोककथा :**

**नागा आणि वाघ**

डिगी हे त्या पर्वताचं नाव होतं. डिगीचा परिसर जंगलानं वेढलेला होता. किती तरी प्रकारचे उंचच उंच वाढलेले आणि एकमेकाना खेटलेले वृक्ष डिगीच्या जंगलात होते. त्या घनदाट जंगलात सूर्यकिरणानादेखील शिरायला जागा नव्हती, तिथं माणसाची गोष्ट कशाला? मैलोन मैल पसरलेले नुसते जंगलच जंगल!

पण या अशा निर्जन जंगलातही एका बाजूला लोहतास नागा जमातीमधील एक बहादूर सरदार झोपडे टाकून राहिलाच. त्याच्या बरोबर त्याची टोळी होतीच. त्याच्याही झोपड्या उभ्या राहिल्या. कारण जंगल होते, तशी जंगलची संपत्तीही होतीच पोट भरायला!

दिवस-मास उलटले. उन्हाळे-पावसाळे आले आणि गेले. लोहतास सरदाराचा व त्याच्या टोळीचा वशवृक्षही वाढू लागला, विस्तारू लागला. नव्या झोपड्या उभारण्याची फार फार आवश्यकता निर्माण झाली.

एके दिवशी सगळे एकत्र बसले. विचार करू लागले. झोपड्या उभ्या करायच्या तर वासे बाबू आहेत, गवत-पाला आहे, जंगलाने भरपूर दिलं आहे, पण जंगलानं जागाच ठेवलेली नाही मोकळी! झोपड्या कुठं उभ्या करायच्या?

एक तरुण खांद्यावरची कुऱ्हाड सरसावीत म्हणाला, "विचार कसला करता।

एवढा ? जंगल तोडायचं अन् जागा करायची ! ”

“ अरे, हे का आम्हाला समजत नाही ? पण जगल तोडायचंच काम किती अवघड ! हात सरकवता येत नाही की वळवता येत नाही अशी दाटी झाडींची, तिथं कुऱ्हाड कशी चालवणार ? ” दुसरा म्हणाला. त्याचे म्हणणे काही खोटे नव्हते. जंगलच तसे दाट होते; आणि म्हणून तर विचार पडला होता !

पण मग जेव्हा दुसरा मार्गच दिसेना, तेव्हा सगळ्यानी तोच विचार ठरवला की, जंगल तोडायचं नि जागा करायची ! पण जंगल एका बाजूनं बाहेरूनच तोडीत न्यायचं म्हणजे कुऱ्हाडी चालवता येतील.

एक दिवस ठरला. सगळ्यानी आपापल्या कुऱ्हाडी परजल्या. देवदेवतेचं, भूत पिशाच्चाचं वळ मागितल आणि एका भल्या मोठ्या पळसाच्या फांद्या तुटू लागल्या मग बुंध्यावर कुऱ्हाडी पडल्या. संध्याकाळपर्यंत झाड उन्मळून पडले ! आसपास उजेड पसरला.

रात्री बराच वेळ श्रमपरिहारार्थ आनंदाने गाणे-बजावणे-नाचणे झाले.

पण सकाळी उठून पाहतात तर तोडलेल्या जागेपासून नवीन बुंधा फुटलेला, त्यावर नवीन फांद्या पसरलेल्या. त्या इतक्या दाट की आधीच्या झाडापेक्षाही त्यानी अंधार करून टाकलेला. नागाना आश्चर्य वाटले. पण त्यानी पुन्हा दुसरे दिवशी तशाच कुऱ्हाडी चालवल्या आणि झाड पाडले. परंतु सकाळी पाहतात तर पुन्हा तिथे झाड नव्याने उभेच !

मग सगळ्यानी ठरवले. आपल्या टोळीचा बुड्ढा बाबा आहे त्याच्याकडे जावे आणि त्यालाच हे रहस्य विचारावे. त्याला त्या करामती झाडाबद्दल नक्कीच काही माहिती असणार !

सगळे गेले, बुढ्या बाबाला हकिकत सांगितली. ती ऐकून बाबा म्हणाला, “ आपल्या टोळीचा जो पूर्वज होता ना, त्याला त्याच्याच एका दोस्ताने कपटाने मारले. पूर्वजाने त्याला शाप दिला, तू वाघ होशील म्हणून ! त्या वाघाचाच कोणी वारस तुम्हाला त्रास देत असणार ! आपले जंगल तुटू नये आणि माणसांनी इथं येऊ नये असं त्या वाघाला वाटत असणार; तर तुम्ही असं करा, झाड पुन्हा तोडा आणि रात्रभर तिथं जवळच कोण येतं त्याच्यावर नजर ठेवून दडून बसा ! ”

नागानी परत येऊन झाड तोडले. बुढ्याने सांगितल्याप्रमाणे रात्री छपून पाहात बसले. मध्यरात्र टळून गेली. एक वाघ आला. आणि तोडलेल्या जागी

जिभेने चाटू लागला. चाटल्याबरोबर पुन्हा झाड सरसरून वाढू लागले. वाघाने जिथे जिथे चाटले तिथे तिथे झाड फुटले !

नागानी सकाळी जाऊन बाबाला हा प्रकार सांगितला. बाबाने मग उपाय सांगितला, " आता झाड पाडल्यावर त्याच्या मुळात विस्तव टाका आणि पार जाळून टाका, म्हणजे वाघाला चाटता येणार नाही. "

नागा परतले. त्यानी बाबाने सांगितले तसेच केले. झाड पार मुळापासून जाळून टाकले. त्याची नावनिशाणीदेखील शिल्लक ठेवली नाही. असे केल्यामुळे त्याच्या दुसऱ्या दिवशी झाड पुन्हा फुटले नाही; पण तो वाघ मात्र चवताळला. त्याने एका नागा सरदाराच्या तरुण मुलाचा फडशा पाडला.

नागा सरदाराला जेव्हा ही बातमी कळली, तेव्हा तो सगळ्याच नागाना उद्देशून म्हणाला,

" हा वाघ आपल्या नाग जमातीचाच शत्रू आहे. याला लवकरात लवकर ठार केले पाहिजे. नाही तर हा रोज एकेकाला खाऊन टाकील आणि आपली जमात संपवून बसेल. "

" खरं आहे, सरदार ! या वाघाचा काटा काढायलाच पाहिजे." एक नागा जवान म्हणाला.

" आम्ही तयार आहोत. पण काटा कसा काढायचा हे तर सांगा ! " दुसऱ्या नागा जवानाने विचारले.

त्यावर सरदार म्हणाला,

" मी सांगतो तसं करा. कापलेल्या झाडाजवळच आणखी थोडी जागा मोकळी करा. झाडं तोडूनच त्या बुंध्याची एकाला एक जोडून भिंत तयार करा. मग मी त्या भिंतीच्या आड भाला घेऊन बसतो. तुम्ही जंगलात हाकारा घालून वाघाला उठवा आणि हुसकावून इकडे आणा, म्हणजे मी भाल्याने त्याची शिकार करतो. "

नागाना ही योजना पटली.

दुसऱ्या दिवशी सगळ्यानी मिळून झाडे तोडली. त्यांच्या बुंध्याची भिंत तयार केली. सरदार भाला घेऊन भिंतीच्या आड दडून बसला. मग सगळ्या नागानी जंगलात हाकारा सुरू केला. त्या वेळी वाघ बांबूच्या जाळीत सुस्त होऊन पसरलेला होता. नागानी बांबूच्या जाळीच्या मागून ढोल-नगारे वडवायला सुरुवात केली. त्या आवाजाने वाघ उठला आणि संकट ओळखून गुरगुरू लागला. पुढच्या

दिशेने निघाला. नागांनी मोठमोठ्याने चित्रविचित्र आरोळ्या ठोकल्या. वाघ जंगल तुडवीत तुडवीत कापलेल्या झाडाजवळ आला. तिथे होती भिंत ! त्याला पुढे जाता येईना तेव्हा सरदाराने आपला भाला नेम धरून वाघाच्या पाठीत खुपसला, तशी वाघ एक डरकाळी फोडून कोसळला. सरदाराने दुसरा भाला त्याच्या पोटात भोसकला आणि आपल्या पुत्राच्या खुन्याचा बळी घेण्याच्या सूडभावनेने त्याने नागाच्या रीतीनुसार सुऱ्याने वाघाचे पंजे छाटले !

नंतर सगळे नागा त्या ठिकाणी जमा झाले. वाघाची शिकार पाहून त्याना आनंद झाला होता. जमातीवरचे संकट टळले होते.

सरदार त्याना म्हणाला, " या वाघाचे मुंडके तोडा आणि गावाच्या जवळ जे झाड आहे त्यावर टांगून द्या ! नंतर झाडाखालीच जमिनीवर सगळ्यानी आपल्या भाल्याच्या खुणा करून ठेवा. कारण वाघाच्या शोधाला जेव्हा वाघीण येईल, तेव्हा ह्या खुणा पाहून गावात घुसण्याची तिची हिम्मत होणार नाही. "

नागानी मग वाघाचे मुंडके तोडले, आणि ढोल-नगारे वाजवीत झाडावर आणून टांगले. खाली जमिनीवर भाल्यानी खुणा केल्या.

रात्री वाघीण वाघाच्या शोधावर निघाली. त्याची पावले पाहात पाहात ती त्या तोडलेल्या झाडाजवळ आली. मुंडके नसलेले वाघाचे धूड अजून तिथेच पडलेले होते. वाघीण तशीच रागारागाने गावाकडे निघाली, तर झाडावर टांगलेले वाघाचे मुंडके तिला दिसले झाडाखालच्या खुणाही दिसल्या. वाघीण मनात म्हणाली, " या गावात बरेच शूर लोक दिसताहेत. गावात असे न शिरलेलेच बरे ! "

वाघीण परत फिरली. पण वाघाला मारलेल्या माणसावर सूड उगविण्याचा तिने मनाशी पक्का निश्चय केला होता. ह्या माणसाना धडा शिकवला नाही, तर आपला वंश नष्ट होईल, अशी तिला भीती वाटू लागली होती.

वाघीण योग्य अशा संधीची वाट पाहात होती. एके दिवशी एक नागा जंगलातून जाताना तिला दिसला. वाघिणीने विचार केला, याच्या मदतीने माणसावर सूड घ्यावा. एकटीने हल्ला करणे बरे नाही. म्हणून ती त्या नागाजवळ जाऊन म्हणाली,

" मला मदत करशील तर तुला खाणार नाही. नाही तर आत्ता तुझा फडशा पाडीन. मी आहे, माझे दोन बछडे आहेत. आम्ही तिघे आहोत, एकटा काय करशील ? "

नागा वाघिणीला आणि तिच्या तिकडेच धावत येणाऱ्या दोन बछड्यांना पाहून घाबरून गेला होता. त्याचे सारे शरीर भयाने थरथरू लागले. घाम फुटला. तो कसेबसे म्हणाला,

" मी कसली मदत करू ? "

वाघीण म्हणाली, " माझ्या वाघाला तुझ्या त्या सरदाराने ठार मारले आहे, होय ना ? "

" होय, होय."

" मग मला त्याचा सूड घ्यायचा आहे. तू मला या कामी मदत कर. जर मदत करशील तर आता जिवंत सुटशील आणि मी तुला जंगलातून पुष्कळशी वनस्पती, जडीबुटी आणून देईन. तिचा उपयोग करून तूच लवकर सरदार बनशील ! "

वाघिणीने दाखवलेल्या लालचीने नागा मोहात पडला त्याने तिच्याशी मैत्री केली. तिला मदत करण्याचे वचन दिले. वाघिणीने त्याला बरीचशी जडीबुटी आणून दिली.

नागा आता गावातल्या लोकांना जडीबुटीच्या जोरावर औषधपाणी देऊ लागला. मंत्रतंत्रही करू लागला. वाघीण रात्र झाली की त्याच्या घरी येई आणि जडीबुटी देऊन जाई. त्याच वेळी नागा तिला गावातल्या सगळ्या वित्तंबातम्या सांगत असे. वाघीण जवळपासच दबा धरून बसत असे आणि एकटा दुकटा नागा सापडला की झडप घालून मारीत असे.

होता होता गावातील दहा पंधरा लोक वाघिणीने ठार केले. सरदार काळजीत पडला. त्याने हे त्या वाघिणीचे सूडाचेच कृत्य आहे हे ओळखले. लोकही भयभीत झाले. केव्हा वाघीण झडप घालील याचा नेम राहिला नाही.

सरदाराने सगळ्या नागांना एकत्र केले. आणि सांगितले, " वाघिणीचा बंदोबस्त केलाच पाहिजे. जंगलात जाऊन हाकारा करा, वाघिणीला हुसका. तिला ठार करू या. "

ही गोष्ट वाघिणीला त्या रात्री फितूर नागाकडून कळली. ती सावध झाली. आपल्या बछड्यासह लांब डोंगराच्या गुहेत जाऊन दडली.

दुसरे दिवशी गावचे सगळे नागा उठले. जंगलात गेले. हाकारा सुरू केला, पण वाघिणीचा मागमूसही लागला नाही. सगळे थकून भागून परतले.

पुन्हा दोन तीन वेळा असेच झाले. मग सरदाराला शंका आली. तो म्हणाला,

" कोणी तरी आपल्यातलाच वाघिणीला फितूर झाला आहे. तिला सगळ्या गोष्टी आधीच कळत असल्या पाहिजेत. ती सावध होत आहे. थांबा, मी त्या फितुराचा पत्ता काढतो."

असे म्हणून मंत्र पुटपुटला आणि त्या वाघिणीला फितूर झालेल्या नागाकडे हात करून त्याने अंगारा फुंकला. म्हणाला,

" हा आहे आपल्यातला फुटीर. "

सगळे नागा त्याच्याकडे रागारागाने बघू लागले. तो म्हणाला, " कोण म्हणतो मी फितुरी केली ? "

सरदार ओरडला, " नसेल केलीस आणि जर सच्चा असशील तर आठ दिवसाच्या आत वाघ मारून त्याची खोपडी आण आणि त्या खोपडीवर हात ठेवून शपथ घे. जर असे करशील तर तू निर्दोष ठरशील आणि तुझ्यावर कसले संकट येणार नाही. पण असे न करशील तर टोळीचा विश्वासघाती ठरशील व तुझा नाश होईल. "

तो नागा मनातून पार घाबरून गेला होता. त्याचे मन त्याला खात होतेच. आता हे सिद्ध करावे लागणार होते !

त्या रात्री नेहमीप्रमाणे वाघीण त्याला भेटली, तेव्हा त्याने तिला ही हकिकत सांगितली. ती ऐकून वाघीण त्याला धीर देऊन म्हणाली,

" तू मुळीच घाबरू नकोस, काळजी करू नकोस. मी तुला वाघाची एक जुनी खोपडी आणून देते."

असे सांगून वाघीण गेली. पण योगायोगाने त्या रात्री त्या नागाचा धाकटा मुलगा जागा होता. त्याने आपल्या बापाचा आणि वाघिणीचा संवाद ऐकला. त्याला नवल वाटले.

दुसऱ्या दिवशी खेळताना त्या मुलाने ही अद्भुत गोष्ट आपल्या सवंगड्याला सांगितली. त्या सवंगड्याने आणखी आपल्या सवंगड्यांना सांगितली. असे होता होता ही गोष्ट सर्व गावभर पसरली. सरदाराच्या कानावर गेली. सरदाराने घेतलेला संशय खरा ठरला होता. सगळ्या नागांनी मग त्या फितूर नागाला धरून आणले आणि ज्या झाडावर वाघाचे मुंडके टांगले होते, त्याच झाडाला त्याला करकचून बांधले.

त्यानंतर दुसरे दिवशी साऱ्या नागांनी अचानक हल्ला करून वाघिणीला घेरले. भाले, बरछा चालवून तिला ठार मारले.

वाघिणीला ठार मारून नागा परतले तेव्हा फितूर नागाही शेवटचे क्षण मोजीत होता. त्याची ही दशा पाहून सरदार म्हणाला,

" हे असेच घडणार होते. जो कोणी वाघाशी दोस्ती करील तो त्या वाघाच्या मरणाबरोबरच मरून जाईल, असा आपल्या पूर्वजाचा शापच आहे. या फितुराला आपल्या दुष्ट करणीची शिक्षा मिळाली आहे."

**मेघालयातील गारो लोककथा :**

## रेशमी कपडा

पुष्कळ पुष्कळ दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. गारो पहाडावर अचिक नावाची एक आदिम जमात वसती करून होती.

या जमातीमध्ये एक खूप धनिक माणूस होता. त्याला एक सुंदर, देखणी मुलगी होती. एकुलती एकच होती. मुलीला भाऊ नव्हता, त्यामुळे त्या धनी माणसाने आपल्या माघारी आपली सगळी संपत्ती या आपल्या मुलीलाच द्यायची असे ठरवले होते.

दिवस-मास उलटले. मुलगी मोठी झाली. आता तिचे लग्न करायचे. धनी माणसाने आपल्याच जमातीमधल्या एका सुदृढ, देखण्या मुलाबरोबर आपल्या मुलीचे लग्न करून दिले. जावयाला पैसा, सोने, हिरे, कपडे, पुष्कळ वस्तू दिल्या.

त्या मूल्यवान वस्तूंमध्ये एक रेशमी कपडा होता. हा रेशमी कपडा फारच आकर्षक होता. त्यावरची कशिदाकारी खूपच कलापूर्ण होती. पाहात राहावी अशी ! आणि तो रेशमी कपडा मोठा अद्‌भुत जादूचाही होता ! एका देवीने वरदान म्हणून हा कपडा मुलीच्या आजीच्या आजीला दिलेला होता. आणि तेव्हापासून तो सांभाळून, जपून घरात ठेवलेला होता.

रेशमी कपड्याला हात लावण्याच्या आधी एक मंत्र जपावा लागत असे. आणि जर कोणी हा मंत्र न जपताच हात लावला तर तो हात लावणारा इसम पक्षी बनत असे. असा तो अद्‌भुत रेशमी कपडा होता.

ही गोष्ट मुलीला ठाऊक होती. तिला ती तिच्या आईने सांगितलेली होती. त्यामुळे ती रेशमी कपड्याला स्पर्श करण्यापूर्वी तो विशिष्ट मंत्र जपत असे.

तिचा पती हा रेशमी कपडा घरात पाहायचा; त्याला तो आवडायचा, पण ती मंत्राची गोष्ट त्याला ठाऊक नव्हती.

काही कालानंतर मुलीचे आई-वडील मरण पावले. मुलगीच त्या घरची मालकीण झाली. ती आपल्या पतीसह तिथे राहू लागली.

एकदा रेशमी कपड्याला ऊन दाखवावे म्हणून मुलीने तो कपडा काढला आणि बाहेर अंगणातल्या झाडीवर पसरून टाकला. उन्हाच्या प्रकाशात तो रेशमी कपडा रत्नासारखा झगमगू लागला.

मुलीने कपडा उन्हात टाकताना त्याला कसल्याही स्थितीत हात लावू नका असे आपल्या पतीला सांगून ठेवले होते.

नंतर काही वेळाने ती जवळच्या तळ्यात मासे पकडायला गेली. ती तळ्यावर पोचली असेल नसेल इतक्यातच आभाळ काळ्या काळ्या ढगांनी भरून आले. विजाही चमकू लागल्या. बघता बघता धो धो पाऊस कोसळू लागला!

झाडीवरले रेशमी वस्त्र भिजू लागले ते पाहून मुलीच्या पतीला काय करावे कळेनासे झाले. त्याने पत्नीला हाक मारली, पण ती तर तळ्यावर होती. हाक ऐकू जाणार कशी?

पाऊसही वाढता वाढता वाढला. रेशमी कपड्याची दशा पतीला पाहवेनाशी झाली. तो तडक अंगणात गेला आणि त्याने तो झाडीवरचा रेशमी कपडा काढण्यासाठी हात पुढे केला. कपड्याला स्पर्श होताच तो एक सुंदर पक्षी बनला. त्याचे पंख त्या रेशमी वस्त्रासारखेच चमकदार, देखणे, रंगीबेरंगी आकर्षक झाले.

तेवढ्यात त्याची पत्नी आली. रेशमी कपडा भिजताना पाहून तीही मंत्र न म्हणताच तशीच धावत गेली आणि कपड्याला हात लावला. त्याबरोबर तीही पक्षी बनली!

ह्या देखण्या पक्ष्यांचेच नाव पडले मोर आणि मोरनी!

असे म्हणतात की, जेव्हा आभाळ ढगांनी भरून येते, विजा लखलखू लागतात, आणि वारे जोराने वाहू लागतात तेव्हा मोर नाचूही लागतो आणि केव्हाही धावू लागतो. त्याला चिंता आणि भीती वाटत असावी की, पावसाच्या पाण्याने, त्या रेशमी कापडासारखे, आपले सुंदर पंख भिजून जाऊ नयेत!

# ‘ आपला भारत ’ माला

आपल्या भारतातील प्रत्येक राज्याचा व केन्द्रशासित प्रदेशाचा
ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक – सर्वांगीण दृष्टिकोणातून
ललितरम्य भाषेत परिचय करून देणारी

## वीस पुस्तके

(१) प्रियतम भारत
(२) सहोदर आंध्र
(३) प्यारो राजस्थान
(४) गरवी गुजरात
(५) सोनसळी बंगाल
(६) कामरूप आसाम
(७) हरित हरियाणा
(८) पंचनद पंजाब
(९) लावण्यखनी काश्मीर
(१०) हिमवंत हिमाचल
(११) करूनाडु कर्नाटक
(१२) कथकली केरळ
(१३) द्राविड तमिळनाडु
(१४) उत्कल ओडिसा
(१५) बुद्धभूमी बिहार
(१६) गंगामैयाचा उत्तर प्रदेश
(१७) विंध्यमित्र मध्यप्रदेश
(१८) मराठमोळा महाराष्ट्र
(१९) सीमान्त राज्ये
(२०) केन्द्रशासित प्रदेश

लेखक

**राजा मंगळवेढेकर**

भारतीयत्वाची ओळख व राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव यासाठी आवश्यक वाचन !

**नितीन प्रकाशन : ११८२ सदाशिव पेठ, पुणे ३०**

